## अयोध्येत रामनवमी दिनी रामलल्लाला सूर्यकिरणांचा अभिषेक



**अयोध्या** : यंदाच्या रामनवमीची समस्त रामभक्तांना प्रतीक्षा आहे, कारण ५०० वर्षांनी प्रभू श्रीराम आपल्या जन्मभूमीत विराजमान झाल्यानंतरची ही पहिलीच रामनवमी असणार आहे. त्यामुळे अयोध्येमध्ये येण्यासाठी रामभक्त आतुर झाले आहेत. यंदाच्या रामनवमीचे सगळ्यात मोठे आकर्षण असेल रामलल्लाच्या मस्तकी होणारा सूर्यतिलक अर्थात सूर्य किरणांचा अभिषेक. रामनवमीच्या दिवशी मध्यान्ही दुपारी १२ वाजता साधारणपणे चार मिनिटे रामलल्लाच्या मस्तकावर सूर्यकिरणांचा अभिषेक होणार आहे. रामलल्लाच्या कपाळी होणारा हा गोलाकार सूर्याभिषेक ७५ एमएम व्यासाचा असेल. रामजन्माच्या दिवशी सूर्यकिरणांनी रामलल्लाचा अभिषेक व्हावा अशी इच्छा मंदिर निर्माणाच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी व्यक्त केली होती. त्यामुळे मंदिर उभारताना या अभिषेकासाठी बांधकाम तज्ज्ञांनी विशेष रचना केली आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २६५
www.ramprahar.com

शनिवार, १३ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २







## पनवेलमध्ये महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा उत्साहात

# खासदार श्रीरंग बारणे यांच्या रूपाने पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट करा

### माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिंपरी-चिंचवडकर खासदार श्रीरंग बारणे यांना एक लाख मतांची आघाडी देणार आहेत. त्या अनुषंगाने पनवेलमधून मतांची आघाडी देण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यावर प्रचाराची धुरा असून पनवेलकरांची जबाबदारी वाढली आहे, असे सांगतानाच खासदार श्रीरंग बारणे यांच्या रूपाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा, असे आवाहन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १२) केले.

मावळ लोकसभा मतदारसंघातील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ महायुती पदाधिकारी मेळावा पनवेलच्या आकुर्ली येथील काकाजीनी वाडी या ठिकाणी झाला. त्या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते.

व्यासपीठावर उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, अमोल इंगोले, पीआरपीचे सीताराम कांबळे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, भीमसेन माळी, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा चव्हाण, (पान २ वर..)






(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

### देशाच्या सुरक्षिततेसाठी नरेंद्र मोदीच पुन्हा पंतप्रधानपदी हवेत -खासदार श्रीरंग बारणे



उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या भाषणात म्हटले की, २०१४ आणि २०१९च्या निवडणुकीत माझ्यावर विश्वास टाकला आणि पुन्हा २०२४च्या लोकसभेसाठी महायुतीने मला संधी दिली आहे. पनवेल, रायगडच्या जनतेने मला भरपूर प्रेम दिले आहे. लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना नागरिकांचे प्रश्न संसदेत मांडण्याचे आणि त्यांची सोडवणूक करण्याचे काम केले. आपला देश सुरक्षित हातात असला पाहिजे यासाठी पुन्हा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी हेच देशाला हवे आहेत. जगात आपल्या देशाची मान उंचावण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यामुळे मोदीजी पुन्हा पंतप्रधान होतील.

### मोदीजी पुन्हा पंतप्रधान होणार हा संपूर्ण जगाला विश्वास -आमदार प्रशांत ठाकूर



भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, देशात एनडीएचे सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करीत असताना अनेक लोककल्याणकारी निर्णय आणि योजना अमलात आल्या. त्यामुळे आज आपला भारत देश एक मोठी ताकद म्हणून जगात सक्षमपणे उभा राहू शकला आहे. मोदीजींनी केलेली कामे आणि जनतेचा त्यांनी जिंकलेला विश्वास ही आपल्या देशासाठी जमेची बाजू आहे. मोदीजी पुन्हा पंतप्रधान होणार हा केवळ आपल्या देशालाच नव्हे; तर संपूर्ण जगाला विश्वास आहे. त्यामुळे जगातील अनेक दिग्गज उद्योग भारतात येण्यासाठी आतुर आहेत. आपल्या देशाचे नाव जगात उंचाविण्याचे काम यापुढेही होणार असून अबकी बार चारशे पार होणार आहे.

## भ्रष्टाचारी नेत्यांना कायमचे घरी बसवा!

### भाजप अध्यक्ष जेपी नड्डांचा घणाघात

**गोंदिया : प्रतिनिधी**



लोकसभेची ही केवळ खासदारास विजयी करण्याची निवडणूक नसून दोन विचारधारांची लढाई आहे. ज्यांचे अनेक नेते जेलमध्ये आणि अनेकजण बेलवर आहेत, अशा भ्रष्टाचाऱ्यांच्या आघाडीतील नेत्यांना कायमचे घरी बसवा, असा घणाघात भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी शुक्रवारी (दि.१२) गोंदिया येथील जाहीर सभेत बोलताना केला.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, भंडारा-गोंदियाचे उमेदवार सुनील मेंढे आदी या वेळी उपस्थित होते.

एकीकडे भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी कटिबद्ध असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरीकडे भ्रष्टाचाऱ्यांना वाचविण्यासाठी एकत्र आलेले इंडिया आघाडीचे नेते यातून योग्य निवड करून देशाच्या विकासाची गंगा नव्या वेगाने वाहती राखण्यासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्या वेळी पंतप्रधानपदी बसवूया, असे आवाहन भाजप अध्यक्ष जेपी नड्डा यांनी या वेळी मतदारांना केले.

## विवेक पाटलांच्या जामिनावर आता २३ एप्रिलला सुनावणी



**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आता २३ एप्रिल रोजी होणार आहे.

सुमारे साडेपाचशे कोटींहून अधिकच्या कर्ज घोटाळा प्रकरणामुळे बंद पडलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष विवेक पाटील यांच्याविरुद्ध खटला सुरू आहे. या खटल्याची सुनावणी सुरू असून पाटील यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे.

या अर्जावर १२ एप्रिल रोजी न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर सुनावणी झाली. मुंबई उच्च न्यायालयात झालेल्या या सुनावणीच्या वेळी ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयातर्फे ॲड. सुनील गोन्साल्विस, तर विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. राहुल ठाकूर उपस्थित होते. पुढील सुनावणी २३ एप्रिल रोजी होईल, असे न्यायालयाने जाहीर केले आहे.

## निवडक

### बंगळुरू कॅफे बॉम्बस्फोटप्रकरणी सूत्रधारासह अन्य एकाला अटक

**कोलकाता** : बंगळुरू येथील रामेश्वर कॅफे बॉम्बस्फोट प्रकरणात राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) मोठी कारवाई करीत मुख्य सूत्रधारासह दोघांना शुक्रवारी (दि.१२) कोलकाता येथून ताब्यात घेतले आहे. सूत्रधार अब्दुल मतीन ताहा आणि कॅफेमध्ये स्फोटक ठेवणारा मुसावीर हुसैन शाहजीब अशी या दोघांची नावे आहेत. १ मार्च रोजी झालेल्या या बॉम्बस्फोटात १० लोक जखमी झाले आहेत. या प्रकरणी एनआयए तसेच स्थानिक पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### बीआरएस नेत्या के. कवितांना १५ एप्रिलपर्यंत सीबीआय कोठडी



**नवी दिल्ली** : दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लॉण्डरिंग प्रकरणात अटकेत असलेल्या भारत राष्ट्र समितीच्या नेत्या के. कविता यांना राऊस एव्हेन्यू कोर्टाने १५ एप्रिलपर्यंत सीबीआय कोठडी सुनावली आहे. कविता यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केल्यानंतर त्यांचा ताबा नंतर सीबीआयने घेतलेला आहे.

# देशात पुन्हा एकदा पंतप्रधान मोदींचे स्थिर सरकार आवश्यक

### खासदार सुनील तटकरे यांचे प्रतिपादन

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाच्या विकासासाठी राजकीय स्थिरता महत्त्वाची असते, कारण ज्या वेळेस देशात अस्थिर सरकार असते, तेव्हा विकासाला खीळ बसते. देशाच्या सर्वांगीण विकासाठी पुन्हा एकदा स्थिर सरकारची आवश्यकता आहे. हे स्थिर सरकार पंतप्रधान नरेंद्र मोदीच देऊ शकतात. त्यामुळे महायुतीचे हात बळकट करायला हवेत, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि रायगड लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी केले. अलिबाग येथे गुरुवारी (दि.११) आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या घटक पक्षांच्या समन्वय मेळाव्यात ते बोलत होते.

या मेळाव्यास भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र दळवी, आमदार रमेश पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, उपाध्यक्ष दिलीप भोईर, शिवसेनेचे तालुका अध्यक्ष राजा केणी, अमित नाईक यांच्यासह शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय, मनसे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



> **कार्यकर्त्यांनी मतभेद, मनभेद बाजूला ठेऊन कामाला लागावे. पाच वर्षांत अनेक घडामोडी झाल्या, पण आता झाले गेले विसरून कामाला लागूया आणि महायुती अधिक भक्कम करूया.**
> **-महेंद्र दळवी, आमदार**

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, देशाने जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या काळात स्थिर सरकारे पाहिली. नंतरचा काळ अस्थिरतेचा होता. या अस्थिरतेचा विकासावर परिणाम झाला. ही अस्थिरता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात दूर झाली. त्यामुळे देशात पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळाली. या स्थिरतेसाठीच भिन्न विचारसरणीचे पक्ष एनडीएच्या माध्यमातून एकत्र आले. यामागे राष्ट्रहीत आहे.

कालबाह्य झालेले कायदे बदलले जातात, तो कायद्यातील बदल असतो. राज्यघटनेतील नाही. त्यामुळे निवडणुका आल्यावर काही घटक संविधान बचावचा नारा देतात, पण कायदे आणि राज्यघटना यातील फरक समजून घेणे गरजेचे असते. राजकारणात संक्रमणे होत असतात. ही संक्रमणे कार्यकर्त्यांनी समजून घेणे आवश्यक असते. उद्याचा विचार करून पुढे जायचे असते. कालपर्यंत परस्पर विरोधात लढलो, पण आता एकत्रित पुढे जायचे आहे. त्यासाठी गावपातळीपासून मतभेद मिटतील याकरिता प्रयत्न करू, असेही खासदार तटकरे यांनी नमूद केले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की अनंत गीते यांना लोकसभेचे काम करण्याची बराच काळ संधी मिळाली, पण या संधीचा त्यांनी मतदारसंघासाठी काय फायदा करून दिला याचे गणित मांडायला बसलो, तर आपल्या पदरी काही पडू शकणार नाही. या मतदारसंघासाठी काय केले हे तेही सांगू शकणार नाही. याउलट जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करताना खासदार सुनील तटकरे यांनी केलेल्या कामांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अलिबागचे मेडिकल कॉलेज असो अथवा म्हसळ्याचे युनानी कॉलेज या मंजुरीसाठी त्यांचे प्रयत्न कोणी नाकारू शकणार नाही.

प्रचारासाठी महिनाही उरलेला नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी घरोघरी पोहचून प्रचार करावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगतात, प्रत्येक बूथवर जिंकायचे आहे. त्यानुसार सर्वांनी प्रचारास लागावे, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

### वैयक्तिक भूमिका बाजूला ठेवून महायुतीच्या विजयाचा विचार करा : आमदार प्रशांत ठाकूर

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सुनील तटकरे यांनी खासदार होणे ही सर्वांची गरज आहे. गेल्या पाच वर्षांत भरभरून निधी रायगडमध्ये आलेला आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत खासदार सुनील तटकरे यांनाही निवडून देणे आपले कर्तव्य आहे. त्यासाठी सर्वांनी कामाला लागले पाहिजे. वैयक्तिक भूमिका बाजूला ठेवून महायुतीचा विचार करा आणि जोमाने प्रचाराला लागा, असे आवाहन भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केले.

## मुंबई उत्तर पश्चिममधून रवींद्र वायकर रिंगणात?



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून लोकसभा निवडणुकीत मुंबईतील उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून आमदार रवींद्र वायकर यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. वायकर यांना उमेदवारी मिळणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

या मतदारसंघात सध्या गजानन कीर्तिकर शिवसेनेचे खासदार आहेत. उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाकडून अमोल कीर्तिकर यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. आता शिवसेनेतून रवींद्र वायकर यांचे नाव आघाडीवर आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघाची आढावा बैठक झाली. या बैठकीत जोगेश्वरी विधानसभेचे आमदार रवींद्र वायकर यांना लोकसभा उमेदवारी देण्यासाठी पक्षातून शिक्कामोर्तब करण्यात आल्याचे समजते. मुख्यमंत्र्यांनी राजकीय नेत्यांसह मनोरंजन क्षेत्रातील कलाकारांची चाचपणी केली होती. अखेर त्यांनी वायकर यांना उमेदवारी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे कळते.

### लोकसभेचा महासंग्राम

## रायगडमध्ये पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल नाही

### १६ इच्छुकांकडून २४ अर्जांची उचल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेस शुक्रवार (दि.१२)पासून सुरुवात झाली. निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पहिल्या दिवशी एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही, मात्र १६ इच्छुकांनी २४ अर्जांची उचल केल्याची माहिती निवडणूक विभागाकडून प्राप्त झाली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत १९ एप्रिलपर्यंत असून सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी अर्ज दाखल करता येणार नाहीत.

एका उमेदवारास जास्तीत जास्त चार अर्ज घेता येतात. नामनिर्देशनपत्रे १९ एप्रिलपर्यंत कोणत्याही दिवशी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत सादर करता येतील. या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्राचे वितरण व स्वीकृती सुरू राहणार आहे. २० एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येणार आहे, तर २२ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. मतदान ७ मे रोजी होणार असून ४ जूनला मतमोजणी झाल्यानंतर ६ जून रोजी निवडणूक प्रक्रिया संपुष्टात येईल.



प्रमुख उमेदवारांपैकी महाविकास आघाडीचे अनंत गीते १५ एप्रिल, तर महायुतीचे सुनील तटकरे १८ एप्रिल रोजी आपले अर्ज दाखल करणार असल्याची माहिती संबंधित पक्षांच्या सूत्रांनी दिली.

नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात उमेदावारासहीत एकूण पाच व्यक्तींनाच प्रवेश दिला जाईल. (उमेदवार व त्याचे चार प्रतिनिधी) नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवाराच्या केवळ तीन वाहनांना कार्यालयाच्या परिसरात प्रवेश देण्यात येणार आहे.

## राज्यात ‘अवकाळी’चा मुक्काम वाढणार

**पुणे : प्रतिनिधी**



राज्यात गेल्या आठवड्याच्या अखेरपासून सुरू झालेला अवकाळी पावसाचा मारा अजूनही सुरू आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे राज्यात मोठे नुकसान झाले असताना हवामान खात्याने ‘अवकाळी’चा मुक्काम पुन्हा वाढण्याचा इशारा दिला आहे. येत्या १५ एप्रिलपर्यंत अवकाळी पावसाचे संकट कायम राहणार आहे.

भारतीय हवामान खात्याने २४ तासांमध्ये विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पावसाची वर्दी दिली आहे. विदर्भातील चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली या तीन जिल्ह्यांना पावसाचा ‘ऑरेंज अलर्ट’ देण्यात आला आहे तसेच बीड, लातूर, धाराशिव, सांगली, परभणी, यवतमाळ, वाशिम, छत्रपती संभाजीनगर व सोलापूरात वादळीवारा आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या जिल्ह्यात पावसाचा ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे.

काही ठिकाणी तूरळक पावसाच्या सरी कोसळतील असा अंदाज आहे. यादरम्यान राज्यात ३० ते ४० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा परिसरावर १.५ किलोमीटर उंचीवर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे, तर आग्नेय राजस्थानमधील चक्राकार वाऱ्यांपासून गुजरात, कोकण, कर्नाटक किनारपट्टीपर्यंत हवेचा कमी दाबाचा सक्रिय आहे.

## निवडक

### प्रवीण शेंडे कार्याध्यक्षपदी नियुक्त



**पनवेल** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशानुसार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने तसेच प्रदेश सरचिटणीस शिवदास कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष महादेव पाटील यांच्या कार्यालयात नवीन पनवेल कार्याध्यक्षपदी प्रवीण शेंडे यांना नियुक्तीपत्र देऊन शुभेच्छा दिल्या. पक्षसंघटना वाढीसाठी प्रयत्न करून आगामी निवडणुकीत पक्ष कुठेही मागे राहणार नाही, असा विश्वास नियुक्तीनंतर प्रवीण शेंडे यांनी व्यक्त केला. या वेळी शहर सोशल मीडिया प्रमुख सचिन कुंभार, उद्योजक उमेश भगत आदी उपस्थित होते.

### पनवेलमध्ये श्री रामनवमी उत्सव

**पनवेल** : श्री बल्लाळेश्वर व श्री रामजी संस्थान पनवेल यांच्या वतीने श्री रामनवमी उत्सव २०२४चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने श्रीराम संकीर्तन त्रिदल (तीन दिवसीय रामकथा), १४ ते १६ एप्रिल श्रीराम कथामृत, १७ एप्रिल सकाळी श्रीराम जन्माख्यान, रात्री पालखी, तसेच १८ एप्रिल सायंकाळी ललिताचे कीर्तन सादरकर्ते हभप नंदकुमार कर्वे, साथसंगत हार्मोनियम: महेश घाटे तबला वेदांत पाटील असणार आहेत. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री बल्लाळेश्वर व श्री रामजी संस्थानचे विश्वस्त यांनी केले आहे.

# उरण-पनवेल मार्गाचे होणार रुंदीकरण

## सिडकोकडून प्रस्ताव; नवघर फाटा ते बोकडवीरा पोलीस चौकीपर्यंत चौपदरी मार्ग



**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील प्रमुख मार्ग असलेल्या उरण-पनवेल या राज्य महामार्गाचे सिडकोच्या माध्यमातून रुंदीकरण करण्यात येणार आहे. त्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असल्याची माहिती सिडकोकडून देण्यात आली आहे.

उरणमधील वाढत्या नागरी व औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या आणि वाहनांतही अनेक पटीने वाढ झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील अपघातातही वाढ झाली आहे. त्यामुळे जुना नवघर फाटा ते उरणच्या कोटनाका दरम्यानच्या रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी करण्यात आली होती. यातील सार्वजनिक बांधकाम विभागाने काही महिन्यांपूर्वीच नवघर फाटा ते बोकडवीरा पोलीस चौकी असा चार ते साडेचार किमी लांबीचा मार्ग सिडकोच्या ताब्यात दिला आहे. त्याचे रुंदीकरण करण्यात येणार आहे, मात्र बोकडवीरा पोलीस चौकी ते उरण शहरातील कोटनाकापर्यंतच्या एक ते दीड किलोमीटरच्या मार्गाचे काय होणार, या मार्गाचेही रुंदीकरण होणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

काही दिवसांपूर्वी बोकडवीरा पोलीस चौकी ते कोटनाका दरम्यानच्या रस्त्यालगतची अनधिकृत दुकाने, व्यवसाय यांच्यावर सिडकोच्या अनधिकृत बांधकामविरोधी पथकाने कारवाई केली होती. त्यामुळे हा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे संपूर्ण मार्गाचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

त्यानुसार उरण-पनवेल या राज्य महामार्गाचे सिडकोच्या माध्यमातून रुंदीकरण करण्यात येणार आहे.

# महिलांनी आपल्या प्रगतीकडे लक्ष द्यावे -रत्नप्रभा घरत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांनी आपल्या स्वतःच्या प्रगती तसेच सक्षमीकरणासाठी वेळ दिला पाहिजे, असे प्रतिपादन पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत यांनी गुरुवारी (दि. ११) महिलांसाठी आयोजीत करण्यात आलेल्या कार्यक्रमात केले.





महालक्ष्मी महिला मंडळाच्या वतीने आणि पटेल ज्वेलर्स पुरस्कृत जागतिक महिला दिनानिमित्त नखरा नथीचा हा कार्यक्रम गुरुवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाचे आयोजन महिला मंडळाच्या अध्यक्ष कविता म्हात्रे, उपाध्यक्ष इंदुमती पाटील, मीना म्हात्रे, निशा म्हात्रे यांनी केले. त्याचे उद्घाटन रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते झाले.

बेलपाडा येथे झालेल्या या कार्यक्रमात नृत्य, फॅशन शो, लकी ड्रॉ तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या विविध स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या महिलांना रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते दागिने भेट देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. नखरा नथीच्या या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महालक्ष्मी महिला मंडळाची स्थापना सुमन म्हात्रे यांनी केली असून महिलांनी एकत्र येऊन आनंद मिळवावा तसेच नवनव्या गोष्टी शिकाव्यात हा यामागचा उद्देश आहे. हिच परंपरा आपण जपूया असे प्रतिपादन स्वप्नाली म्हात्रे यांनी केले.

या वेळी महापालिकेच्या माजी नगरसेविका दर्शना भोईर, महिला मोर्चाच्या प्रतिभा भोईर यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



**पनवेल : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने २०२१ साली घेण्यात आलेल्या परीक्षेत एसटी संवर्गातून जितेंद्र सोनावणे हे महराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळवून पोलीस उपनिरीक्षकपदी त्यांची निवड झाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्यासह जितेंद्र सोनावणे यांचे आई-वडील उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये मतदान जनजागृतीसाठी प्रभात फेरी, बचत गटांच्या सभा

**पनवेल : प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवरती स्वीप कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी (दि.१२) राजिप शाळा भिंगार व मोर्बे, खेरणे, पाली देवदच्या वतीने प्रभातफेरी काढण्यात आली. त्याचप्रमाणे नवीन पनवेलमधील सात बचतगटांमधील महिलाच्या बैठकीमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.






लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांची अंमलबजावणी मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदारसंघांतर्गत महापालिका कार्यक्षेत्र तसेच पनवेल ग्रामीण भागात केली जात आहे. स्वीप आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व पथक प्रमुख अधिकारी मुख्य अभियंता संजय जगताप, गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत.

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्या वतीने व तहसील कार्यालयाच्या वतीने विविध शाळांच्या माध्यमातून प्रभातफेरीच्या माध्यमातून मावळ लोकसभा मतदारसंघामधील पनवेल विधानसभा मतदारसंघांतर्गत मतदान जनजागृती केली जात आहे.

शुक्रवारी राजिप शाळा भिंगार व मोर्बे, खेरणे, पाली देवदच्या वतीने प्रभातफेरी काढून मतदान जनजागृती करण्यात आली, तसेच मतदान जनजागृतीसाठी नवीन पनवेल येथील सात बचत गटाच्या महिलांची एकत्रित बैठक घेण्यात आली. या वेळी ८५ वर्षांवरील मतदार व दिव्यांग यांच्यामध्येही मतदान जनजागृती करण्यात आली.

# पनवेलमधील खाद्यपदार्थ हातगाड्यांवर बेकायदा मद्यविक्री

## कारवाईची मागणी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी शहरातील रस्त्यालगत, चौकांमध्ये आणि इतर मोक्याच्या ठिकाणच्या जागा चायनीजसह खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी बळकावल्याचे चित्र आहे. रात्र होताच रस्त्यावर फास्टफूड विक्रेते, चायनीज सेंटर यांच्या गाड्या लागत आहेत. पहाटेपर्यंत चालणाऱ्या या हातगाड्यांवर होणाऱ्या गर्दीत रस्तादेखील अडवला जात आहे, तसेच या ठिकाणी मद्यविक्रीसुद्धा करण्यात येत असल्याने अशा फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी पुढे येत आहे.

शहरात अनधिकृत फेरीवाल्यांचा शिरकाव झाला आहे. शहरातील, शहराबाहेरील व्यक्तींकडून दिवसा, रात्री हातगाड्या मांडून पदपथावर व्यापार केला जात आहे. त्यात उघड्यावर खाद्यपदार्थ विकणाऱ्यांचीही मोठी भर पडली आहे. रस्त्यांवरच सिलिंडर मांडून खाद्यपदार्थ शिजवून विकले जात आहेत. त्यामध्ये फास्टफूड, चायनीज, तसेच इतर खाद्यपदार्थ विक्रेत्यांचा समावेश आहे. यामुळे सिलिंडरच्या स्फोटाच्या, आगीच्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. शिवाय उघड्यावर शिजवल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांमुळे आरोग्याचाही प्रश्न निर्माण होत आहे, त्याचप्रमाणे अनेक ठिकाणी बेकायदा मद्यविक्रीसुद्धा सर्रास सुरू आहे. काही गाळ्यांमध्येसुद्धा चायनीज सेंटरमध्ये विनापरवाना मद्यविक्री होत असल्याने या चायनीज गाड्यांवर राज्य उत्पादन शुल्क पथकाने कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

मध्यंतरी उघड्यावर, रस्त्यांवर सिलिंडर वापरून व्यवसाय करणाऱ्यांवर पोलिसांकडून अधून-मधून कारवाई केली जात होती, मात्र त्यातही एकीकडे कारवाई केली जाते, तर दुसरीकडे कानाडोळा केला जातो. यामुळे काही ठिकाणे रात्रीच्या वेळी व्यावसायिकांच्या सोयीची ठरत आहेत, अशा सर्वच ठिकाणी कारवाईची विशेष मोहीम राबवली जाण्याची गरज आहे. अनके वेळा अशा ठिकाणी रात्री-अपरात्री गुन्हेगारी प्रवृत्तीच्या टोळ्यादेखील जमत आहेत.

त्यांच्यात हाणामारीच्या घटनादेखील घडलेल्या आहेत. चायनीज सेंटर व खाद्यपदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# देहव्यापार करणाऱ्या तीन महिलांवर खारघर ठाण्यात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

आफ्रिकन महिलांमार्फत चालवल्या जाणाऱ्या वेश्याव्यवसायावर पोलिसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी तीन महिलांवर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर पोलिसांच्या पथकाने छापा टाकून ही कारवाई केली आहे.

खारघर सेक्टर १२ ई येथील रो हाऊसमध्ये आफ्रिकन महिलांमार्फत वेश्याव्यवसाय केला जात असल्याची माहिती हवालदार विनय तळभंडारे यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ निरीक्षक राजीव शेजवळ यांनी नेमलेल्या पथकाने बनावट ग्राहक पाठवले होते. या बनावट ग्राहकाने त्याठिकाणी जाऊन खात्री केली असता पोलिसांनी छापा टाकला.

या वेळी एक आफ्रिकन महिला पोलिसांना चकमा देऊन पळून गेली, तर दोन महिला हाती लागल्या. त्यांच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आफ्रिकन महिलांनी राहण्यासाठी रो हाऊस भाड्याने घेऊन त्यामध्येच वेश्या व्यवसाय सुरू केला होता.








**पनवेल : तालुका पत्रकार विकास मंचचे सचिव पत्रकार हरेश साठे यांच्या वाढदिवसानिमित्त खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह पत्रकार बांधवांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, सरचिणीस दशरथ म्हात्रे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, पत्रकार विजय कडू आदी उपस्थित होते.**

# महिला कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सीकेटी आणि एसएमडीएल कॉलेजच्या मार्शल आर्ट ॲक्टिव्हिटी क्लासच्या मुली प्रशिक्षक धनेषा शिंगोटे (ब्लॅक बेल्ट), शिवानी नांगरे (ब्राऊन बेल्ट) आणि आशा यादव (ग्रीन बेल्ट) यांनी एमआयडीसीच्या पिरामल कंपनीच्या महिला, मुली कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले.



महिला आत्मरक्षा प्रशिक्षण ही आता काळाची गरज झाली आहे कारण महिला व मुलींना अन्याय व अत्याचारामुळे आज त्यांना स्वसंरक्षण प्रशिक्षण महत्त्वाचे झाले आहे. म्हणूनच आजकाल प्रत्येक कंपनी, शाळा, महाविद्यालयात महिलांसाठी स्वसंरक्षण शिबिरे आयोजित केली जात आहेत. ही बाब लक्षात ठेऊन व समजून घेऊन आज पिरामल फार्मास्युटिकल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या एचआर डिपार्टमेंटच्या वतीने शी टॉक सेशन या संकल्पनेखाली त्यांच्या कंपनीतील सर्व महिला कर्मचाऱ्यांसाठी महिला आणि मुलींच्या आत्मसंरक्षण शिबिराचे आयोजन केले होते.

सीकेटी कॉलेजच्या मार्शल आर्ट्स क्टिव्हिटी वर्गातील सिनियर गर्ल धनेशा शिंगोटे यांना त्या शिबिरासाठी खास आमंत्रित करण्यात आले होते, तसेच आशा यादव आणि कुमारी शिवानी नांगरे या एसएमडीएल कॉलेजच्या मार्शल आर्ट ॲक्टिव्हिटी क्लासच्या वरिष्ठ ब्राऊन बेल्टच्या विद्यार्थिनी असे हे तिघेही गेले होते. त्यांनी शिबिरात उपस्थित महिलांना अतिशय उत्तम, नेमकेपणाने आणि सोप्या पद्धतीने प्रशिक्षण दिले.


## संपादकीय

# सेमी फायनलची रंगत

आगामी लोकसभा निवडणुकांसाठीचे महाराष्ट्रातील पहिल्या टप्प्यातील मतदान आता आठवडाभरावर येऊन ठेपले आहे. राज्यात लोकसभेच्या ४८ जागा आहेत. पूर्वापार महाराष्ट्र हे लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचेच राज्य मानले गेले आहे. त्यात यंदाची महाराष्ट्रातील अभूतपूर्व राजकीय परिस्थिती पाहता ते सर्वच राजकीय पक्षांसाठी आव्हानात्मक आहे. चर्चेच्या असंख्य फेऱ्या व तितक्याच नाराजी नाट्यांनंतर निवडणुकीपूर्वीचे चित्र आता काहीसे स्पष्ट होऊ लागले आहे.

**राजकारणात कधीच काही अंतिम असे नसते असे म्हटले जाते. त्यामुळे अगदी मतदानाच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत परिस्थिती कशी कशी बदलत-पालटत जाते याकडे सगळ्यांनाच लक्ष ठेवावे लागणार आहे, पण लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात आता पुरता रंग भरू लागला आहे हे निश्चित. या निवडणुकीमध्ये राज्यात परस्परांविरोधात उभ्या ठाकलेल्या दोन्ही बाजू, अर्थात महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यातील अंतर्गत जागावाटपाचा तिढा एव्हाना बऱ्यापैकी सुटला आहे. यंदाची लोकसभा निवडणूक राज्यात पहिल्या पाच टप्प्यांतील मतदानाने पार पडणार आहे. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे रोजी राज्यात मतदानाची प्रक्रिया पार पडेल. राज्यातील मतदानाचे पहिले दोन टप्पे विदर्भातील असून विदर्भातील लढती कशा असतील याचे चित्र पुरते स्पष्ट झाले आहे. महाविकास आघाडी व महायुती यांच्यातील जागावाटपाचा अंतर्गत तिढाही बहुतांशी संपला आहे. उद्धव ठाकरे गटाला २१ व काँग्रेसला १७ तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागांवर समाधान मानावे लागले आहे. जागावाटपात उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी आघाडी धर्म पाळण्याचे आघाडीतील ज्येष्ठांचे आवाहन बासनात गुंडाळून ठेवून २१ जागा स्वत:कडे ओढून घेतल्या आहेत खऱ्या, पण त्यातून प्रत्यक्षात त्यांच्या हाताला काही लागणार आहे का ते मतमोजणीनंतर दिसेलच. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत एनडीएचा घटक असलेल्या तेव्हाच्या अखंड शिवसेनेने २३ जागा लढवल्या होत्या आणि १८ जिंकल्या होत्या, पण आता पक्षाचे मूळ नाव आणि चिन्हदेखील गमावून बसलेल्या उद्धव ठाकरे यांच्याकडे या १८ खासदारांपैकी फक्त पाचच शिल्लक आहेत. विरोधकांच्या आघाडीत जागावाटपात उद्धव ठाकरे यांनी मनमानी केली असली तरी मतदारांसमोर ती चालणार नाही. भारतीय जनता पक्षाने यंदा 'अब की बार चारसो पार'चा नारा उगाच दिलेला नाही. भाजप जे काही करतो ते पूर्वतयारीनिशी असते हे सारेच जाणतात. राज्यातील ४८पैकी ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य पक्षाने ठेवले आहे आणि त्या दिशेने पक्षाची आखणी, मोर्चेबांधणीदेखील सुरू आहे. 'चारसो पार'चा टप्पा गाठण्यासाठी प्रत्येक बुथवर विक्रमी मतदान व्हावे याकरिता भाजपचे नेते, कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत. २०१४च्या मोदी लाटेत विक्रमी मतदान झालेच, परंतु २०१९मध्येही मतदान एका टक्क्याने वाढले. या वेळी नव्याने मतदार झालेल्यांची संख्या मोठी असून त्यांच्याकडे पक्षाकडून विशेष लक्ष दिले जाते आहे. महायुतीच्या जागावाटपात नाशिकसह आणखी दोन जागांचा तिढा तेवढा सुटायचा आहे. ही जागा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे राहणार की भाजप, राष्ट्रवादीकडे जाणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. यंदा जागावाटपापासून प्रत्यक्ष मतदानापर्यंत अवघी लढत अतिशय रंगतदार होणार असल्याने आणि या साऱ्याचाच आगामी विधानसभा निवडणुकांवर मोठा प्रभाव पडणार असल्यामुळे महाराष्ट्राकडे सगळ्यांचेच डोळे लागलेले आहेत.**

# भाषा व इतिहास संशोधक अनंत प्रियोळकर



मराठी भाषेतील 'पाठचिकित्साशास्त्रा'चे आद्य प्रणेते म्हणून ओळखले जाणारे अनंत प्रियोळकर मूळचे गोव्यातील फोंडा तालुक्यातील प्रियोळ या गावी ५ सप्टेंबर १८९५ रोजी जन्मले. आज त्यांचा स्मृतीदिन (१३ एप्रिल १९७३) आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख...

त्या काळात गोव्यात मराठी शाळा नव्हत्या. त्यांचे प्रारंभीचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले. प्रियोळ व असमोडे येथे त्यांचे चौथीपर्यंतचे मराठी शिक्षण झाले. पुढे माध्यमिक शिक्षण फोंडा येथील सरकारी शाळेत झाले. अल्मैद महाविद्यालयातून १९१८ साली ते मॅट्रिक झाले. त्यानंतर ज्युनिअर बीएपर्यंतचे शिक्षण धारवाड कर्नाटक महाविद्यालय व पुढे सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातून १९२३मध्ये साली ते बीए झाले.

महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांच्यात लेखनाची आवड आणि ऊर्मी होती. त्या वेळच्या 'विविधज्ञानविस्तार' या प्रतिष्ठित मासिकात त्यांचे लेखन प्रसिद्ध होत असे. प्रारंभीच्या काळात 'अरुणोदय, बीए' या टोपणनावाने त्यांनी काही कविताही केल्या होत्या. या कविता 'नवयुग', 'स्वयंसेवक' या मासिकांमधून प्रसिद्ध झाल्या होत्या. पदवी प्राप्त झाल्यावर काही काळ त्यांनी कोकणातील वेंगुर्ला येथे 'जॉर्ज इंग्लिश स्कूल'मध्ये शिक्षक म्हणून काम केले. या काळातही त्यांचा लेखन-अध्ययन-संशोधनाचा व्यासंग सुरूच होता. याच काळात ते मुंबई येथे गेले असताना 'विविधज्ञानविस्तार'च्या कचेरीत गेले होते. त्यांची लेखनातील गती आणि संशोधन वृत्ती पाहून सदर मासिकाच्या संपादकांनी त्यांच्याकडे त्या मासिकाचे सहसंपादक होण्याची विचारणा केली आणि ही मोठी संधी उपलब्ध होत असल्याचे पाहून त्यांनी वेंगुर्ल्याची शिक्षकाची नोकरी सोडून मुंबईतच वास्तव्य करण्याचा निर्णय घेतला. त्याच सुमारास त्यांना मुंबई कॉर्पोरेशनच्या स्कूल कमिटीतही नोकरी मिळाली. त्यामुळे आवडीच्या दोन्ही क्षेत्रांत आणि ती ही मुंबईत संधी मिळाल्याने प्रियोळकरांच्या हातून मोठे काम होऊ शकले. १९२६ ते १९४७ अशी एकवीस वर्षे त्यांनी नोकरी करून १९४७ मध्ये सेवानिवृत्ती स्वीकारली.

दरम्यानच्या काळात त्यांच्या लेखन, संपादन, संशोधन ह्यांना खूपच गती मिळाली आणि मराठी भाषेला एक खंदा संशोधक मिळाला. 'नलदमयंती स्वयंवर' या १९३५ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पहिल्या ग्रंथाने मराठी साहित्यक्षेत्रात संशोधक म्हणून त्यांचे नाव प्रसिद्ध झाले. हा ग्रंथ अशा प्रकारचा पहिला पाठचिकित्सात्मक ग्रंथ होता. या ग्रंथाला मुंबई विद्यापीठाचे पारितोषिक मिळाल्याने 'प्रियोळकर' या नावाला एक वलय मिळाले. पुढे त्यांनी भाषाशास्त्रीय दृष्टीकोनातून मराठी व कोकणी भाषांचा अभ्यास सुरू केला व त्यातूनच ख्रिश्चन धर्मोपदेशकांच्या मराठी साहित्याकडे त्यांचे लक्ष गेले. 'ख्रिस्तपुराण' व अन्य मराठी ग्रंथांच्या चिकित्सक, संशोधनात्मक अभ्यासातून प्रियोळकरांनी 'सांतु अंतोनीची जीवित्वकथा', 'गोमंतकाची सरस्वती', 'हिंदुस्थानचे दोन दरवाजे', 'मुक्तेश्वर महाभारत', 'दोलामुद्रिते', 'मुंबईचा वारसा' इत्यादी संशोधनमूल्य असलेल्या अनेक ग्रंथांची निर्मिती केली. संशोधन क्षेत्रात त्यांनी 'प्रियोळकर युग' निर्माण केले.

प्रियोळकरांनी अत्यंत परिश्रमाने जुनी हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ जमा करून त्यांचे संशोधन करून ती प्रसिद्ध केली. दादोबा पांडुरंग डॉ.भाऊ दाजी यांची आत्मचरित्रे त्यांनी प्रसिद्ध केली. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख व गोविंद नारायण माडगावकर यांचे लेख, परशुराम तात्या गोडबोले संपादित 'नवनीत'ची शताब्दी आवृत्ती इत्यादींचे त्यांनी संपादन व प्रकाशन केले. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या 'मराठी संशोधन मंडळा'चे प्रमुख म्हणून त्यांनी १९४८ ते १९६६एवढा प्रदीर्घ काळ काम केले. या संस्थेच्याच 'मराठी संशोधन पत्रिके'तही त्यांनी स्वतःचे व इतर अनेकांचे संशोधित लेखन प्रसिद्ध केले. कारवार येथे १९५१साली भरलेल्या ३४ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी मराठी साहित्याच्या संशोधनाला दिशा देणारे भाषण करून दुर्मीळ हस्तलिखिते, भाषा यांच्या संशोधनावर भर दिला.


प्रियोळकरांनी संशोधनाला शिस्त लावली, पुराव्याशिवाय कोणतेही विधान करायचे नाही यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यांच्या संशोधनाबद्दल भीमराव कुलकर्णी म्हणतात, 'थोडक्यात सांगायचे म्हणजे, त्यांनी 'Age of Chronicals'मधून 'Age of Documents'मध्ये मराठीचे संशोधन आणून ठेवले', प्रियोळकर संशोधक असले तरी ते चित्रकार, कवी होते. त्यांचे ललित लेखनही शैलीदार होते. त्यांची 'गोंडवनातील गावगुंड' ही कादंबरी डॉ.श्री.व्यं. केतकरांनाही उत्तर देणारी होती.

**-मधू नेने**

# जीवाणू शास्त्रज्ञ वसंत खानोलकर

वसंत रामजी खानोलकर यांचा आज जन्मदिन. त्यांनी भारतातील आधुनिक वैद्यकशास्त्राचा पाया घातला. ते प्रसिद्ध जीवाणू शास्त्रज्ञ होते. देशाच्या निरनिराळ्या प्रांतातील लोकांच्या आहाराच्या व इतर सवयी तसेच तेथील कर्करोगाचे प्रमाण यांचा संबंध तपासण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्यांचा जन्म १३ एप्रिल १८९५ कोकणातील एका छोट्या खेडेगावात एका गोमंतक मराठा समाजातील सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी धोंडो खानोलकर एक प्रतिष्ठित शल्यचिकित्सक होते.

वसंत खानोलकरांनी लहानपणीच डॉक्टर व्हायचे ठरवले होते. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. त्याच वर्षी ते इंग्लंडला रवाना झाले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी संपादन केली आणि १९१८ मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. १९२३ मध्ये ते रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एम.डी. झाले. या काळात त्यांनी मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात अमूल्य अनुभव मिळवला. ते सर्वात कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर होते. भारतात परत येऊन ते ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्र शिकवू लागले.




शिक्षणासाठी उपयुक्त विविध नमुन्यांचे संग्रहालय त्यांनी सुरू केले. रोगनिदानशास्त्राच्या पद्धतशीर शिक्षणाची सुरुवात त्यांनी केली. पाश्चात्य देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत भारतीय शिक्षण कमी पडू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमात अनेक बदल सुचवले. वैद्यकीय शिक्षणामध्ये मूलभूत विज्ञान, प्रायोगिक जीवशास्त्र, जीवरसायनशास्त्र, जीवभौतिकशास्त्र तसेच संख्याशास्त्र यांचे महत्वाचे स्थान त्यांनी ओळखले होते. खानोलकरांनी रोगनिदानशास्त्राचे शिक्षक या नात्याने या विषयाच्या अभ्यासाला नवीन दिशा दिली. खानोलकरांनी सेठ जी. एस. मेडिकल महाविद्यालय व केईएम रुग्णालयात कामाच्या एका वेगळ्या परंपरेची सुरुवात केली. त्यामुळे या संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरांवर एक अत्युत्तम वैद्यकीय संस्था असण्याचा मान मिळाला. जैवभौतिकी, उपयोजित जीवशास्त्र इत्यादी विषयांची सुरुवात त्यांनी मुंबई विद्यपीठात केली. या कालावधीत खानोलकरांना कर्करोग आणि कुष्ठरोग यांच्या अभ्यासामध्ये विशेष कुतूहल व आवड निर्माण झाली. तेव्हा त्यांनी शिक्षकी पेशातून अंग काढून घेतले आणि टाटा मेमोरियल रुग्णालयात प्रमुख रोगनिदानतज्ज्ञ म्हणून १९४१मध्ये ते रुजू झाले. त्यांनी कर्करोग, कुष्ठरोग, पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र, मानवी अनुवंशशास्त्र या विषयात संशोधन केले. कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांनी तीन पुस्तके आणि शंभरहून जास्त शोधनिबंध प्रकाशित केली आहेत. अशा या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचे २९ ऑक्टोबर १९७८ रोजी निधन झाले.



## बदलते तंत्रज्ञान

# ...तर गुगल सर्चसाठी पैसे द्यावे लागणार?; कंपनीकडून बदल

इंटरनेट वापरणं ही आजच्या काळाची गरज बनली असून सोशल मीडिया हाही त्याचा अविभाज्य घटक झाला आहे. त्यामुळेच, दिवसेंदिवस नेटीझन्स आणि इंटरनेट युजर्संची संख्या वाढताना दिसत आहे.




इंटरनेट युजर्समध्ये सर्वाधिक लोकप्रिय सर्च इंजिन म्हणजे गुगल होय. गुगलने आत्तापर्यंत युजर्संना अनेक सेवा मोफतच दिल्या आहेत. त्यातूनही कंपनीला मोठा महसूल जमा होत आहे, मात्र आता कंपनीने नवीन पॉलिसी लागू करण्याचा विचार सुरू केला आहे. त्यानुसार कंपनीकडून प्रिमियम फिचर्सवर काम सुरू झाले आहे. एआय जनरेटीव्ह संबंधित हे फिचर्स असून त्यासाठी युजर्संना पैसे द्यावे लागणार आहेत.

गुगलने काही दिवसांपूर्वीच गुगल सर्चसह जनरेटीव्ह एआय स्नॅपशॉट फिचर एक्सपेरिमेंटल फिचर लाँच केले होते. या फिचरच्या मदतीने युजर्संना सर्च केलेल्या टॉपिक संदर्भात एआय सर्च रिझल्टपेक्षाही अधिक दाखवले जाते. एआय सर्च केलेल्या एका टॉपिकची समरी युजर्संना दिसून येते, मात्र आता कंपनीकडून याच बदल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. फायनान्सियल टाइम्सने आपल्या वृत्तांकनात माहिती दिली. त्यानुसार जर गुगलने असे बदलाव केल्यास गुगलकडून पहिल्यांदाच सर्ज इंजिनच्या वापरासाठी युजर्संकडून पैसे (चार्ज) घेतले जातील.

गुगल सर्चमधून कंपनीची मोठी कमाई होते, मात्र ChatGpt आल्यानंतर कंपनीच्या बिझनेसवर परिणाम होत असल्याचे भीती व्यक्त होत आहे. चॅट जीपीटी प्लॅटफॉर्म लाँच होऊन दीड वर्षापेक्षा अधिक काळ झाला आहे. आता, कंपनीकडून बिझनेस मॉडेलच्या अनुषंगाने मोठ्या बदलाचे संकेत दिले जात आहेत. त्यावरुन कंपनी एआयबाबत कशा प्रकारे विचार करते हे यावरुन दिसून येते.

गुगलकडून त्या विचारांचा पर्याय शोधला जात आहे, ज्यामुळे एआय फिचर्सला प्रिमियम सबस्क्रीप्शनसोबत जोडले जाऊ शकेल. कंपनीकडून Gemini एआयअसिस्टंट फीचर्स पहिल्यापासूनच जी-मेल आणि डॉक्ससह देत आहे. कंपनीतील यासंबंधित जोडलेल्या तीन जणांकडून ही माहिती देण्यात आली आहे. रिपोर्टनुसार इंजिनिअर्स या टेक्नॉलॉलीवर काम करत आहेत, मात्र कंपनी एक्झिक्युटीव्हकडून याबाबत अद्यापही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही.

# अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता सतिश कौशिक

अभिनेते, दिग्दर्शक, निर्माता सतिश कौशिक यांचा आज जन्मदिन आहे. सतिश कौशिक यांनी आतापर्यंत अनेक हिंदी चित्रपटात महत्वाच्या भूमिका निभावल्या आहेत. एक अभिनेता म्हणून ते 'मिस्टर इंडिया'मधील कॅलेंडर, 'दीवाना मस्ताना' मधील पप्पू पेजर आणि सारा गॅवरॉनच्या ब्रिक लेनमधील चानू अहमद या भूमिकेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यांना दोनदा फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट विनोदी अभिनेता म्हणून पुरस्कार मिळाला आहे. आज आपण सतिश कौशिक यांचा संपूर्ण प्रवास येथे जाणून घेणार आहोत.

सतिशचंद्र कौशिक यांचा जन्म १३ एप्रिल १९५६ रोजी झाला. धनौंडा, महेंद्रगड जिल्हा, पूर्व पंजाब हे त्यांचे होमटाऊन आहे. सतिश हे नवीवाला गली, करोलबाग, दिल्ली येथे लहानाचे मोठे झाले, त्यानंतर पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते पुण्यात आले आणि त्यांनी फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामध्ये प्रवेश घेतला. सतिश यांनी किरोरी माल कॉलेज, नवी दिल्ली येथून पदवी शिक्षण घेतले. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा, नवी दिल्ली येथून त्यांनी अभिनयाचे धडे घेतले. सतिश यांनी शशी यांच्याशी लग्न केले. त्यांना वनिष्का ही मुलगी आहे.

सतिश कौशिक यांनी १९८३मध्ये आलेल्या मासूम चित्रपटापासून अभिनयात पदार्पण केले. या चित्रपटात तनुजा, सुप्रिया



**निमित्त**

पाठक आणि सईद जाफरी यांच्यासह नसीरुद्दीन शाह आणि शबाना आझमी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. यात जुगल हंसराज, आराधना आणि उर्मिला मातोंडकर बाल कलाकाराच्या भूमिकेत आहेत.

अनिल कपूर आणि श्रीदेवी यांच्यासोबत मिस्टर इंडिया या हिट चित्रपटातील कॅलेंडर या भूमिकेसाठी ते प्रसिद्ध आहेत. त्यांचा मित्र डेव्हिड धवन दिग्दर्शित कॉमेडी चित्रपट (१९९७) 'दीवाना मस्ताना'मधील पप्पू पेजर या भूमिकेसाठी ते प्रसिद्ध आहेत. २०१६च्या उडता पंजाब या चित्रपटात तायाजीची भूमिका त्यांनी साकारली होती. १९८९मध्ये राम लखन (काशीराम) १९९६च्या साजन चले ससुरालमध्ये (मुथ्थू स्वामी), १९९७ मिस्टर आणि मिसेस खिलाडीमध्ये चंदा मामा, १९९८ परदेसी बाबू (हरपाल 'हॅपी' सिंग), बडे मियाँ छोटे मियाँ (शराफत अली), घरवाली बहारवाली (जंबो), छोटा चेतन (प्रोफेसर चश्मीश), १९९९ हसिना मान जायेगी (कुंजबिहारी लाल), आ अब लौट चलें (चौरसिया),बडे दिलवाला (पोलिस निरीक्षक इकबाल शेख),हम आपके दिल में रहते हैं (जर्मन), हद कर दी आपने (प्रकाश चौधरी), दुल्हन हम ले जायेंगे (हसत इन्स्पेक्टर), २००१ क्यो की... मैं झुठ नहीं बोलता (मोहन)

दिग्दर्शक म्हणून त्यांचा पहिला चित्रपट १९९३चा श्रीदेवीचा रूप की रानी चोरों का राजा हा होता. दुसरा १९९५मध्ये प्रेम हा तब्बूचा पहिला चित्रपट होता. दोन्ही बॉक्स ऑफिसवर फारसे हिट झाले नाही, मात्र त्यांनी हार न मानता दिग्दर्शनाचे काम सुरूच ठेवले आणि १९९९मध्ये हम आपके दिल में रहते हैं या चित्रपटाने पहिला हिट चित्रपट मिळवला. त्यांनी फिलिप्स टॉप टेन या टीव्ही काउंटडाउन शोचे सह-लेखन आणि अँकरिंग केले आहे. यासाठी त्यांना स्क्रीन व्हिडिओकॉन पुरस्कार देखील मिळाला.

नवाब जंग बहादूर या कॉन्टिलो प्रॉडक्शनद्वारे निर्मित, ड-इ टीव्हीचा नवीन शो द ग्रेट इंडियन फॅमिली ड्रामामध्ये मुख्य भूमिकेत ते होते. आता त्यांनी तेरे नाम या त्यांच्या हिट चित्रपटाचा सिक्वेल बनवण्याचा निर्णय घेतला आहे. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : दुपारच्या सुमारास पडणाऱ्या कडक उन्हामुळे एसटी बसस्थानकात तुरळकच प्रवासी दिसून येतात (छाया : तन्वी पवार)



## आरोग्य प्रहर

# हाडांच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरते 'ही' थेरपी

वैद्यकीय प्रगतीमुळे हाडांच्या आरोग्याशी संबंधित असलेल्या विविध आरोग्य स्थितींच्या उपचारांमध्ये नवनवीन पर्याय पहायला मिळत आहे. यापैकी म्हणजे सेल बेस थेरपी, ही एक अत्याधुनिक पध्दत असून हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि हाडांशी संबंधित अनेक विकारांवर उपचार करण्यासाठी शरीराच्या स्वतःच्याच पेशींचा वापर करते. हाडांच्या आरोग्य चांगले राखण्यासाठी सेल बेस थेरपीचा वापर केला जात आहे.



सेल्युलर थेरपी, ज्याला सेल-बेस थेरपी किंवा रिजनरेटिव्ह मेडिसिन म्हणूनदेखील ओळखले जाते, त्यात हाडांसह खराब झालेल्या ऊतींची दुरुस्ती आणि पुनःनिर्मिती करण्यासाठी स्टेम पेशींच्या पुनरुत्पादक क्षमतांचा वापर करणे गरजेचे आहे. स्टेम पेशी या अद्वितीय पेशी आहेत ज्यात शरीरातील विविध प्रकारच्या पेशींमध्ये विकसित होण्याची उल्लेखनीय क्षमता आहे. याबाबत डॉ. प्रदीप महाजन यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

हाडांचे आरोग्य सुधारण्यासाठी सेल्युलर थेरपीचा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे ऑस्टिओपोरोसिस, फ्रॅक्चर आणि हाडांसबंधीत दोष यासारख्या परिस्थितींवर यशस्वी करण्याची क्षमता आहे. ऑस्टियोपोरोसिस, विशेषतः, हाडांची घनता कमी होणे आणि फ्रॅक्चरमुळे वाढलेली संवेदनशीलता याचा यात समावेश आहे. ऑस्टियोपोरोसिसचे पारंपारिक उपचार हाडांची झीज कमी करण्यावर किंवा औषधे आणि जीवनशैलीतील बदलांद्वारे हाडांची घनता वाढवण्यावर भर देतात. जरी हे दृष्टिकोन काही प्रमाणात प्रभावी असले तरी ते हाडांची बळकटी तसेच हाडांचे कार्य पुर्ववत करु शकत नाहीत. आणखी एक महत्त्वाचा फायदा असा आहे की यामुळे हाडांचे आरोग्य सुधारते जे शेवटी व्यक्तींमध्ये वय उलटण्यास मदत करते.

सेल्युलर थेरपी हाडे ठिसूळ होण्याच्या मूळ कारणाला लक्ष्य करून व्यापक उपचार करते. प्रभावित भागात स्टेम सेल्स वापर करुन ऊतींच्या पुनरुत्पादनास मदत होते. यामुळे फ्रॅक्चरचा धोका कमी होतो आणि रूग्णांच्या जीवनाची गुणवत्ता वाढू शकते.

विद्यमान हाडांच्या समस्यांवर उपचार करण्याव्यतिरिक्त, सेल्युलर थेरपीमध्ये प्रतिबंधात्मक उपचार देखील केले जातात. विशेषत: रजोनिवृत्तीनंतरच्या महिला आणि वृद्ध व्यक्तींसारख्या उच्च-जोखीम असलेल्या लोकांमध्ये पुनरुत्पादक पद्धतींद्वारे हाडांचे आरोग्य सुधारुन हाडांशी संबंधित विकारांची प्रगती कमी करणे आणि लोकसंख्येच्या विस्तृत भागासाठी परिणाम सुधारणे शक्य होऊ शकते.

# पोलादपुरात वणव्यामुळे तापमानवाढ

## प्रतिबंधात्मक उपायांची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील सह्याद्री रांगांतील वणव्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. परिणामी दिवसा आणि रात्रीच्या तापमानात कमालीची वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सकाळी ६ वाजेपर्यंत २३ अंश सेल्सियस तापमान असताना चार तासांनंतर ३१ अंश आणि दुपारी साडेतीन वाजेपर्यंत ४२ अंश सेल्सियस तापमान वाढल्याचे दिसून येत आहे. वनविभागामार्फत वणवा प्रतिबंधक उपायांचे मजूरीदर अतिशय अत्यल्प असल्याने प्रतिबंधात्मक उपायांसाठी कोणीही पुढे सरसावत नसल्याने हे मजूरीदर वाढविण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.



कोकणात ऑक्टोबर हिटपासून डोंगरमाथा गरम होऊन वणवे लागण्यास सुरुवात होत असते. या वणव्यांचा सर्वात जास्त कालावधी मार्च ते मेदरम्यानच्या आर्द्रता कमी होऊन उष्णता वाढीमध्ये दिसून येत असून वणवा टाळण्यासाठी अथवा थांबविण्यासाठी चार ते सहा फूट रूंदीचे लांबपर्यंत चर खणून चरातील गवत काढून वणव्यांना थोपविण्याचा उपाय केला जातो, मात्र वनविभागाकडून या चरासाठी अतिशय अत्यल्प मजूरीदर दिला जात असल्याने स्थानिक वनमजूरांना हा मजुरीचा दर परवडत नसल्याने ही कामे करण्यासाठी कोणीही धजावत नाही.

गेल्या आठवड्यामध्ये तालुक्यातील वाकण गोपाळवाडी ते पितळवाडीच्या नदीपात्रापासून रस्त्यापर्यंतच्या भागामध्ये साधारणपणे तीन किमी रस्त्याच्या एका बाजूला लागलेल्या वणव्यामुळे प्रचंड उष्णता निर्माण होऊन अनेक झाडांना जीवंत अग्निप्रवेश मिळाल्याने झाडांच्या फांद्या आणि बुंधे करपून झाडे निष्पर्ण झाल्याचे पहायला मिळाले. काही झाडे बुंध्यात पेटून रस्त्यावर कोसळल्याचेही दिसून आले.

या वणव्यांमध्ये पोलादपूर तालुक्यातील पक्षी व वनसंपदा असलेला पुष्कळसा परिसर या वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडल्याने जैवविविधतेचे प्रचंड नुकसान झाले आहे, मात्र हा वणवा पसरत असताना कोणत्याही प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा प्रयोग वनविभागाकडून करण्यात आला नाही.

# दोन वर्षांपासून चकवा देणाऱ्या आरोपीला बेड्या

**खोपोली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात पोलिसांच्या रडारवर असलेला आणि दोन वर्षांपासून गुंगारा देणारा युनूस सिराज सैय्यद, (वय ३९, रा. मच्छींद्रगड, वाळवा, जि. सांगली) याच्या मुसक्या आवळण्यात खोपोली पोलिसांना यश आले आहे.



युनुस सैय्यद याचेवर सोलापूर, कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद व रायगडसह विविध जिल्ह्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल होते. युनूस मोठमोठे सावज गळाला लावून डंपर खरेदीसाठी कर्ज मिळवून देतो असे सांगून फसवणूक करायचा. खोपोलीतदेखील अशा प्रकारचा गुन्हा केला होता. याप्रकरणी पोलीस युनूसचा शोध घेत होते. यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक तयार करण्यात आलेले होते. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खोपोली शितलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कर्मराज गावडे, हवालदार सागर शेवते यांनी तपासादरम्यान युनूस सैय्यदची गोपनिय बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त केली. युनूस सातारा येथे राहत असल्याची त्यांना खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पोलीस पथकाने गुरुवारी (दि.११) युनूसला अटक केली.

आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक पार्श्वभूमीवर गुन्हेगारी अभिलेख असणाऱ्या व्यक्तींवर आणि संभाव्य गुन्हे करण्याची शक्यता असणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रतिबंधक कारवाई करणे आणि यापूर्वीच्या गुन्ह्यांमध्ये निष्पन्न, परंतु फरारी झालेले गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांना अटक करणे अशा प्रकारची विशेष मोहीम जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

त्याकरिता संबंधित उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली आरोपींचा शोध घेण्याकरिता विशेष पथके स्थापन करण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत आरोपींचा कसून शोध घेऊन त्यांना अटक करण्यात येत आहे.

# मोग्रज-कळकराईला जोडणारा रस्ता होणार

## वनविभागाकडून जमीन देण्यास परवानगी

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायतीमधील दुर्गम भागात कळकराई गावासाठी आता रस्ता होणार आहे. मोग्रज ते कळकराई हा साधारण पावणेपाच किमीचा रस्ता बनविण्यास वनविभागाने परवानगी दिली आहे. रस्त्याच्या कामासाठी शासनाने साडेसात कोटींचा निधी मंजूर करून दिला आहे.



मोग्रज ग्रामपंचायतीमध्ये कळकराई हे गाव आहे. दुर्गम भागात वसलेल्या या गावात ६० घरांची वस्ती असून हे गाव ढाक या दुर्गम भागातील गावाच्या डोंगर रांगेत वसले आहे. २०१९पासून आजपर्यंत कळकराई गावासाठी रस्ता व्हावा यासाठी प्रयत्न झाले. वनजमीन मोठी असल्याने वनविभागाची परवानगी मिळणे आवश्यक होते. त्यामुळे वनपरिक्षेत्र अधिकारी कर्जत पूर्व यांनी सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल यांच्यामार्फत अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारीत नियम २०१२मधील कलम ३(२)नुसार रस्ता बनविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. कळकराई नवीन जोडरस्त्याकरिता मोग्रज ग्रामपंचायत हद्दीत वनविभागाचे राखीव क्षेत्र आहे. कळकराई हे मोग्रज आदिवासीवाडी रस्त्याकरिता लागणाऱ्या वनक्षेत्राचे परिवर्तन करण्याकरीता मागणी करणारा प्रस्ताव सर्व शिफारशींसह सादर करण्यात आला होता. वनविभागाने ४.७५ किमीचा रस्ता तयार करण्यासाठी परवानगी दिली. राज्य सरकारच्या अर्थसंकल्प २०२२-२३मध्ये दिड कोटींची तरतूद शासनाकडून करून घेतली होती. यावर्षी या रस्त्यासाठी सहा कोटींचा निधी मंजूर आहे. त्यामुळे मोग्रज ते कळकराई रस्त्यासाठी साडेसात कोटींचा निधी मंजूर आहे. या रस्त्यासाठी प्रस्ताव मंजूर झाल्यावर ग्रामस्थांनी जिल्हा उपवन संरक्षक राहुल पाटील यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले.

## वाढत्या उष्म्यामुळे मातीच्या माठाला अधिक पसंती

**रायगड** : मागील दोन आठवड्यांपासून वातावरणात वाढत असलेल्या उष्म्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशा उष्म्यापासून थोडा थंडावा मिळावा यासाठी फ्रीजऐवजी अनेकजण मातीच्या मडक्यातील थंड पाण्याला पसंती देत आहेत. त्यामुळे मातीच्या मडक्याला दिवसेंदिवस मागणी वाढत आहे.

जुन्या काळातील माठाचा वापर लोप पावत चालला होता. त्यातच कुंभारांना मडकी बनविण्यासाठी लागणारी माती, लाकडे, तूस, राखाडी या गोष्टी मिळणे कठीण झाले होते, मात्र कोरोना काळात पिण्याच्या थंड पाण्यासाठी फ्रीजचा वापर कमी करून मातीच्या माठांना अधिक पसंती मिळू लागली. त्यामुळे मातीच्या मडक्यांची जोरदार विक्री सुरू झाली आहे. मागील वर्षीच्या तुलनेने यंदा मातीच्या मडक्यांच्या विक्रीमध्ये वाढ झाली आहे.

# मुरूडमधील रस्त्यांच्या साईडपट्ट्या तातडीने भरण्याची मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

साळाव ते मुरूड व मुरुड ते आगरदांडा या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम जोरदार सुरू आहे. या रस्त्याला कार्पेट करण्यात येत आहे. त्यामुळे साहजिकच रस्त्याची उंची वाढत आहे. रस्त्याची उंची वाढल्याने बाजूचा कच्चा रस्ता हा खोलगट झाल्याने याचा सर्वाधिक त्रास दुचाकी व ऑटो रिक्षाचालकांना होत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने त्वरित घेऊन मातीचा भराव टाकून साईडपट्ट्या त्वरित भरून देण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख कार्यकर्ते व माजी नगरसेवक मनोज भगत व माजी सरपंच अजीत बाळकृष्ण कासार यांनी केली आहे.



सध्या साळाव व आगरदांडा भागातील रस्ते नवीन होत आहेत. यासाठी रस्त्याचे मजबुतीकरणाचे काम सुरू आहे. तालुक्यातील मुख्य रस्त्याच्या होत असलेल्या डांबरीकरणात दुतर्फा असलेल्या साईडपट्ट्या धोकादायक ठरत आहेत.

या साईडपट्ट्या न भरल्यामुळे दुचाकी अपघातात वाढ होत आहे. नुकतेच एका रुग्णवाहिका चालकाच्या प्रसंगावधनामुळे दुचाकीस्वाराचा प्राण वाचवण्यात यश आले. त्यामुळे या साईडपट्ट्या लवकरात लवकर भरण्याची मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

याबाबत उपअभियंता उमेश राठोड यांनी, साईडपट्ट्या भरण्याचे काम लवकरच सुरू करणार आहोत. रस्त्याचे मजबुतीकरण केल्याने रस्त्याची उंची वाढली ही बाब सत्य आहे. अंदाजपत्रकात साईडपट्ट्या भरण्याची तरतूद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# पोलादपुरातील ५१ मतदान केंद्रांवर जनजागृती अभियान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील ५१मतदान केंद्रांवर स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदार जनजागृती कार्यक्रमांचे नियोजन तहसीलदार कपिल घोरपडे यांनी केले आहे. २७ मतदान केंद्रांवर आतापर्यंत मतदार जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.




५१पैकी २७ मतदान केंद्रांमध्ये स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी मतदार जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन केले असून शिक्षण विभाग, एकात्मिक बाल विकास प्रकल्प व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयामार्फत चित्रकला स्पर्धा, सायकल रॅली, रांगोळी स्पर्धा, पथनाट्य, महिला मेळावा, गृहभेटी आणि प्रभातफेरी आदी उपक्रम राबविले जात आहेत.

तालुक्यातील सवाद १ व सवाद २, धारवली, कामथे, कालवली, लोहारे १ व लोहारे २, तुर्भे बुद्रुक, तुर्भे खुर्द, तुर्भे खोंडा, गोवेले, वझरवाडी, पोलादपूर १, पोलादपूर २, पोलादपूर ३, पोलादपूर ४, पोलादपूर ५, पोलादपूर ६, काटेतळी, सडवली, रानवडी बुद्रुक, बोरावळे १, बोरावळे २, घागरकोंड, साखर, उमरठ, ढवळे, करंजे, देवळे, वाकण १, वाकण २, कापडे बुद्रुक १ व कापडे बुद्रुक २, धामणदिवी, महाळुंगे, केवनाळे, रानकडसरी, दाभिळ, कापडे खुर्द, देवपूर, भोगाव खुर्द, चांभारगणी बुद्रुक, निवे, पैठण, महारगूल, परसुले, कोतवाल खुर्द, कोतवाल बुद्रुक, कुडपण बुद्रुक, पळचिल या ५१ केंद्रांमध्ये ४ एप्रिल ते २० एप्रिलपर्यंत मतदार जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार कपिल घोरपडे यांनी दिली.

# मुरूडमध्ये उद्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव

**मुरूड** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३वा जयंती महोत्सव तालुका बौद्ध समाज सेवा संघाच्या अधिपत्याखाली रविवारी (दि.१४) दरबार हॉल येथे आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त भव्य बाईक रॅली, युवा वक्ता सुमेध भालेराव संगमनेरकर यांचे क्रांतिकारी व्याख्यान तसेच प्रबोधनात्मकपर संगीत बहार या ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आहे. संस्थेचे हे ५९वे वर्षे असून तालुक्यातील एकूण २२ गावांमधील बौद्ध बांधव व भगिनी बहुसंख्येने एकत्र येऊन दरवर्षी जयंती महोत्सव व त्यानिमित्त विविध सामाजिक उपक्रमाचे सातत्याने आयोजन करतात, अशी माहिती संस्थचे तालुका सचिव धर्मेश मोरे यांनी दिली.


**पनवेल महानगरपालिका**
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | Vikram Singh Rawat, Secretary Jal Vayu Defence Enclave CHS Ltd, Plot No. 20, Sector-20, Kharghar - 410210 | ०३ गुलमोहर झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील Jal Vayu Defence Enclave CHS Ltd, Plot No. 20, Sector-20, Kharghar या सोसायटी आवारातील ०३ गुलमोहर झाडे धोकादायक स्थीतीत असुन संरक्षक भिंतीला तडे गेले असल्यामुळे संरक्षक भिंत तुटु शकते व झाडे पडुन जीवीत हानी होऊ शकते. |
| २ | मे.मंगलमुर्ती कंन्स्ट्रक्शन, पनवेल तर्फे भागीदार श्री.मयुरेश दिनकर पाटकर, ऑफीस नं.१०४, पहिला मजला, वृंदावन हाईट्स, बापट वाडा, टिळक रोड, पनवेल | ०१ अशोक व ०२ नारळ अशी एकूण ०३ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील अंतिम भुखंड क्र.५०५, महाराणा प्रताप रोड, परदेशी आळी पनवेल या भुखंडाच्या आवारातील ०१ अशोक व ०२ नारळ अशी एकूण ०३ नवीन इमारत बांधकाम करण्यास अडथळा निर्माण करीत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र २४७/२४७/२०२४
दिनांक :- १२/०४/२०२४

सही/-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे तुरमाळे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| तुरमाळे | अशोक काळूराम मढवी<br>अरूण काळूराम मढवी<br>पुष्पा काळूराम मढवी<br>सुहासिनी सुरेश मढवी<br>भारती गुरूनाथ मते<br>किशोर नामदेव घरत<br>राजेश नामदेव घरत<br>हिरामण आंबो गायकर<br>अनिता धर्मा वाजेकर<br>गुरुनाथ आंबो गायकर<br>धनश्री प्रकाश गायकवाड.<br>कविता आंबो गायकर<br>जयश्री दत्तात्रेय पाटील<br>तेजश्री महेंद्र मायदे<br>राजश्री दत्तात्रेय भोपी<br>प्रमोद धर्मा वाजेकर<br>विनोद धर्मा वाजेकर<br>अनंता जोमा वाजेकर<br>वनिता बाळाराम पाटील<br>शंकर आंबो गायकर | १०८ | १ | ०-२३-०० | ४.५६ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत ह्याची नोंद घ्यावी.

ता. १२/०४/२०२४
पनवेल

सही/-
**ॲड. प्रधान मधुकर पाटील**

१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२



**जाहीर नोटीस**

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौज-वाघाची वाडी, ता. पनवेल, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तींच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :

**- मिळकतीचे वर्णन -**
**मौजे वाघाची वाडी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड.**

| मौजे | गट नं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भोगवटादाराचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| वाघाची वाडी | ६/८<br>प्लॉट नं.१७ व सब प्लॉट नं. २,३,५,६ | ०-४०-००<br>बिनशेती<br>४०-००-०० | ४००-०० | १. काशिबेन लल्लुभाई मोकानी<br>२. त्रिभुवन नानजी झांजरुकीया<br>३. प्रविणभाई नानजी झांजरुकीया<br>४. जयेश वसंत झांजरुकीया<br>५. हरेश वसंत झांजरुकीया<br>६. अरुणाबेन बटुकभाई मोजिद्रा<br>७. कल्पना प्रकाश मोजिद्रा<br>८. अंजना किशोर वडगामा<br>९. किरणकुमार झेड झांजरुकीया<br>१०. मंजुला दिनेश झांजरुकीया<br>११. रश्मी भावेश कटुडीया<br>१२. उर्वशी ऋषभ अग्रवाल<br>**रा. वाघाची वाडी, ता. पनवेल, जि.रायगड** |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक: १२/०४/२०२४

सही/-
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
(बी.ए.एलएल.बी.)

पत्ता. शॉप नं. ३, ४, हरे कृष्णा सोसायटी, सेक्टर. ०५, नवीन पनवेल, पनवेल, रायगड
मो. क्र. ९६९९४९९९६३


## निवडक

### महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



**नवी मुंबई :** महापालिकेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीदिनानिमित्त मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, परिमंडळ २ उपआयुक्त चंद्रकांत तायडे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहाय्य आयुक्त जयंत जावडेकर, स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### कोप्रोली येथे विविध धार्मिक कार्यक्रम



**उरण :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ॐ साई सार्वजनिक पदयात्रा मंडळ कोप्रोली यांच्या सौजन्याने श्री साई चरित्र पारायण व सत्यनारायणाची महापूजा तसेच साई भंडाराचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही दिवस श्रीसाई बाबांची काकड आरती, बाबांचे मंगलस्नान, साई चरित्र वाचन, मध्यान्ह आरती, हरिपाठ, धूप आरती, दर्शन सोहळा, महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भाविक भक्तांनी, ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग दर्शविला.

### नागाई सामाजिक ट्रस्टतर्फे शोभायात्रा



**नवी मुंबई :** नागाई सामाजिक सेवा ट्रस्टच्या वतीने वाशी ते त्र्यंबकेश्वर पायी दिंडी यात्रेच्या वतीने पारंपरिक वेशात टाळ-मृदुंगाच्या तालात जागृतेश्वर शिवमंदिर ते छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख हभप डॉ. निलेश महाराज शास्त्री यांनी शास्त्रोक्त पद्धतीने गुढीची उभारणी केली. गुढीपूजन माजी वॉर्ड अध्यक्ष बाळकृष्ण पाटील व हभप भगवान महाराज भोईर यांनी सपत्नीक केले. हा कार्यक्रमासाठी अध्यक्ष हभप खंडेराव भोईर, हभप बाळकृष्ण महाराज भोईर, हभप भास्कर महाराज म्हात्रे, कृष्णा भोईर, रामनाथ म्हात्रे, महेश कुलकर्णी, निलेश प्रव्हाणे, सुधाकर पाटील, संजय भोईर, दिलीप पाटील, हरिपाठ मंडळ व आरती मंडळ यांनी प्रयत्न केले.

### लाल मिरच्यांचे भाव घसरले

**नवी मुंबई :** एप्रिल-मे महिन्यात ऊन वाढायला लागते तसे घराघरांमध्ये मसाला करण्याची तयारी सुरू होते. गेल्या काही महिन्यांपासून मिरचीच्या किमतीत घसरण झाल्याचे पहायला मिळत आहे. सध्या हेच दर १५० ते ३५० रुपयांपर्यंत घसरले आहेत. ऊन वाढायला सुरुवात झाली की, अनेकजण मसाला करण्याच्या तयारीला लागतात. यावर्षी अगदी दिवाळीपासूनच लाल मिरचीचा ठसका वाढला होता. लाल मिरचीची आवक जानेवारीपासूनच सुरू झाली असून दरही आवाक्यात असल्यामुळे गृहिणींना दिलासा मिळाला आहे.

# नवी मुंबईत बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

## मनपा आरोग्य विभागापुढे आव्हान; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापलिका कार्यक्षेत्रात नागरिकांना चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी ठिकठिकाणी क्लिनिक आणि हॉस्पिटल उभारली आहेत, मात्र या ठिकाणी किती डॉक्टर बोगस आहेत? याची नोंद सध्या नवी मुंबई मनपा आरोग्य विभागाकडे उपलब्ध नाही. काही बोगस डॉक्टरांच्या चुकीच्या उपचाराने रूग्णांना जीवाला मुकावे लागू शकते. अशा बोगस डॉक्टर तपासणीची शोध मोहीम सुरु करण्याचे आव्हान नवी मुंबई मनपा आरोग्य विभागापुढे निर्माण झाले आहे.



नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात तुर्भे, तुर्भे नाका, महापे, ऐरोली, चिंचपाडा, इंदिरानगर, शिरवणे गाव, करावे गाव, कोपरखैरणे, घणसोली गावसह, ठाणे, बेलापूर एमआयडीसी झोपडपट्टीमध्ये मोठ्या संख्येने बोगस डॉक्टर आपले दुकान थाटून बसलेले असतात. नवी मुंबईतील अशा बोगस डॉक्टरकडे इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) संघटनेचे दुर्लक्ष होत असल्याने अशा डॉक्टरांचे पुरते फावलेले आहे. आजारी रुग्ण अशा डॉक्टरांकडून उपचार घेत असल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता जास्त असते.

नवी मुंबई मनपा नागरी आरोग्य केंद्र हद्दीतील नव्याने प्रॅक्टिस सुरू करणाऱ्या संबंधित डॉक्टरची कागदपत्रे मनपाचे संबंधित डॉक्टर तपासत असतात. कागदपत्रे, डिग्री, कौन्सिल नोंद आदींबाबत संशय आल्यास त्याची माहिती स्थानिक पोलीस ठाण्यास कळविले जाते. त्यानंतर संबंधित पोलीस आणि मनपा वैद्यकीय अधिकारी त्या डॉक्टरच्या क्लिनिक ठिकाणी येऊन सर्व कागदपत्रे तपासतात. जर त्याची कागदपत्रे बोगस असल्याचे आढळल्यास डॉक्टरविरोधात एफआयआर नोंद केली जाते.

अशा सर्व बोगस डॉक्टर यांच्यावर ९० दिवसांच्या आत पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची कायद्यात तरतूद आहे, मात्र अशा किती बोगस डॉक्टरवर गुन्हे दाखल होऊन त्यांना शिक्षा झाली? हे गुलदस्त्यातच असल्याचे एका वैद्यकीय अधिकाऱ्याने सांगितले.

> **नवी मुंबईतील रुग्णालयाची नोंद महापालिकेकडे असते. खासगी प्रॅक्टिशनर्सनी क्लिनिक सुरू करण्यापूर्वी पालिकेकडे नोंद करायला हवी. सद्यस्थितीत मनपाचा कार्यभार प्रशासन करीत आहे. त्यामुळे अशा डॉक्टर मंडळींचे फावले आहे.**
>
> **-डॉ. सुदर्शन रणपिसे, नवी मुंबई**

> **नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रातील खासगी दवाखाने, प्रॅक्टिस करणारे डॉक्टर्स यांची नोंद नवी मुंबई मनपाकडे असते. शहरातील विविध ठिकाणी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टर्सची माहिती घेणे सुरू आहे. बोगस डॉक्टर्स आढळतात तेव्हा कारवाई करण्यात येईल.**
>
> **-डॉ. प्रशांत जवादे,**
> **मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नवी मुंबई मनपा**

# प्रवासी भाडे नाकारणाऱ्या १३८ रिक्षाचालकांवर कारवाई

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई वाहतूक पोलीस विभागाने प्रवासी भाडे नाकारणाऱ्या रिक्षाचालकांवर एका दिवसात विशेष मोहीम राबवून १३८ जणांवर कारवाई केली आहे, अशी माहिती वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी दिली.

बेशिस्त रिक्षाचालकांना वठणीवर आणण्यासाठी कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्याकडून वाहतूक विभागास देण्यात आले आहेत. त्यानुसार अशा बेशिस्त रिक्षाचालकांवर नवी मुंबई वाहतूक शाखेच्या पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारण्यास प्रारंभ केला आहे. त्यामुळे बेशिस्तपणा करणाऱ्या रिक्षाचालकांचे धाबे दणाणले आहे.

नवी मुंबई कार्यक्षेत्रात काही रिक्षाचालक वाहतुकीचे नियम न पाळता बेजबाबदारपणे रिक्षा चालवत असलेचे निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने नवी मुंबई वाहतूक विभागाकडून नवी मुंबई कार्यक्षेत्रातील रिक्षा युनियन नेते तसेच रिक्षा मालक/चालकांची एकत्रित बैठक आयोजित केली होती.

यामध्ये सर्व रिक्षाचालकांनी वाहतुकीचे नियम पाळणेविषयी वेळोवेळी सूचना दिल्या होत्या, तरीही नवी मुंबई कार्यक्षेत्रात काही रिक्षाचालक हे वाहतुकीचे नियम न पाळता नियमांची पायमल्ली करून बेजबाबदारपणे रिक्षा चालवणे तसेच भाडे नाकारणे अशा अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने वाहतूक पोलिसांनी भाडे नाकारणाऱ्या रिक्षा चालकांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. बुधवारी (दि. १०) राबवलेल्या विशेष मोहिमेत १३८ रिक्षाचालकांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

यापुढेही वाहतुकीच्या नियमांची पायमल्ली करून बेजबाबदारणे रिक्षा चालवणारे तसेच भाडे नाकारणारे रिक्षा चालक/मालक यांच्यावर वेळोवेळी कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे रिक्षामालक/चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे, असे आवाहन नवी मुंबई वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी केले आहे.

## फ्लेमिंगो क्षेत्रात सौरदिवे खांब काढण्यास सुरुवात

**नवी मुंबई :** महापालिकेच्या विद्युत विभागाकडून कोणतीही परवानगी नसताना फ्लेमिंगो तसेच स्थलांतरित पक्ष्यांचा अधिवास तसेच नेरुळ येथील टीएस चाणक्य तलाव परिसरातील कांदळवन तसेच पाणथळ क्षेत्रात सौरदिव्यांचे खांब बसवण्याने पर्यावणप्रेमींकडून अनेक तक्रारी आल्या होत्या. त्यामुळे अखेर गुरुवारी सायंकाळपासून सौरदिव्यांचे खांब काढण्यास सुरुवात झाली आहे.

नवी मुंबई महापालिकेकडून बेलापूर परिसरात सौरदिवे लावण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. याबाबत कांदळवन विभागाकडे पर्यावरणप्रेमींनी तक्रार केल्यानंतर महापालिका प्रशासनाने सौरदिव्यांचे खांब काढण्यास महापालिका प्रशासनाने सुरुवात केली आहे.

## बसथांब्यांवरील डिजिटल फलक बंद

**प्रवाशांची गैरसोय**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

एनएमएमटीने बस थांब्यावर लावलेले डिजिटल फलक पुन्हा बंद पडले आहेत. त्यामुळे बस संबंधित थांब्यांवर नेमकी कधी येईल, हे प्रवाशांना कळत नाही.

२०१८मध्ये ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आली होती, मात्र २०२२-२३मध्ये हे फलक बंद पडले. त्या वेळी नव्याने घेतलेल्या बसगाड्यांमध्ये फोर जी स्पेक्ट्रम प्रणाली होती आणि डिजिटल फलकासाठी वापरण्यात येणारी प्रणाली ही टू जी स्पेक्ट्रमची होती. त्यामुळे फोरजी प्रणाली टूजी प्रणालीला सहाय्यकारी ठरत नव्हती. याबाबत अनेक तक्रारी आल्यावर प्रणाली अद्यायावत करण्यात आली, मात्र आता पुन्हा हे फलक बंद पडले आहेत.

याबाबत संबंधित विभाग अधिकाऱ्यांना विचारणा केली असता निवडणुकीच्या कामात व्यग्र असल्याने आता काही सांगू शकत नाही, असे सांगण्यात आले, तर व्यवस्थापक याच्याशी संपर्क न झाल्याने प्रतिक्रिया मिळू शकली नाही.





**पनवेल :** भाजप कळंबोली मंडळतर्फे थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# टिफिन बैठकांमधून महायुतीला मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार

**नवी मुंबई : बातमीदार**

भाजप प्रदेश स्तरावरून देण्यात आलेल्या सूचनेनुसार गुरुवारी (दि.११) नवी मुंबई भाजप सर्व बूथ स्तरावर समाजसुधारक महात्मा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी घेण्यात आलेल्या टिफिन बैठकांमधून महायुतीला नंबर एकचे मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार करण्यात आला.

टिफिन बैठकांमधून सुपर वॉरियर्स, बूथ अध्यक्ष, शक्ती केंद्रप्रमुख, पन्ना प्रमुख, प्रकोष्ट, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून मतदार याद्यांचे वाचन केले, तसेच बूथ स्तरावरील कामकाजाचा आढावादेखील घेतला. उपस्थितांकडून नमो ॲप डाऊनलोड करून घेण्यात आले. त्याचबरोबर मायक्रो डोनेशनही करून घेण्यात आले. आमदार गणेश नाईक यांनी कोपरखैरणे येथे बूथ क्रमांक ३०४ ते ३१० या ठिकाणी, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी वाशीतील बूथ क्रमांक १८, १९ आणि २१ येथे तर माजी खासदार संजीव नाईक यांनी बोनकोडे येथील बूथ क्रमांक ३३१,३३२,३४८ येथे झालेल्या बैठकांमध्ये महात्मा फुले यांना अभिवादन केले. आमदार गणेश नाईक यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत घडत असून तेच तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील, असा विश्वास व्यक्त केला. आमदार नाईक म्हणाले, आज महिला सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांद्या लावून प्रगती करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५१ टक्के प्रतिनिधित्व आहे. पंतप्रधान मोदी यांनी महिला वंदन विधेयक मंजूर करून महिलांना लोकसभेमध्ये ५० टक्के प्रतिनिधित्वाचा मार्ग मोकळा केलेला आहे. आज महिलांना समाजात जो मान सन्मान मिळतो आहे, त्यामागे महात्मा ज्योतिबा फुले यांचा संघर्ष आणि महिलांच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले महान कार्य याचा सिंहाचा वाटा आहे.

भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करीत समाजाची अवहेलना सहन करीत ज्या काळी वंचितांसाठी शिक्षण ही स्वप्नवत गोष्ट होती, त्या काळी महिलांच्या शिक्षणासाठी महात्मा फुले यांनी पुढाकार घेतल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच आपले उमेदवार असून गेल्या १० वर्षांत त्यांच्या कणखर नेतृत्वाखाली देशाने सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे. जगामध्ये देशाचा मानसन्मान वाढला आहे. पुढील ४० दिवस सर्वांनी परिश्रमपूर्वक काम करून महायुतीच्या उमेदवाराला जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून द्यावे, मोदीजींचा नमस्कार घरोघरी पोहचवा, असे आवाहन केले.

माजी खासदार संजीव नाईक यांनी, महाराष्ट्रातील महिलांच्या सक्षमीकरणाचे बीजारोपण महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याच्या रूपाने झाले आहे, असे प्रतिपादन केले. नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी देशात अबकी बार चारसो पार आणि महाराष्ट्रात ४५ पार हे ध्येय साध्य करण्यासाठी महायुती पुढे जात असल्याचे सांगितले.



# उरण पूर्व भागातील उजाड माळरानाचे झाले नंदनवन!

## रानपाखरे घेताहेत फळाफुलांचा मनसोक्त आस्वाद

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील कोमणादेवी येथील उजाड माळरानावर सारडे विकास मंचाच्या वतीने वनराई फुलविली असून, या वनराईला ऑक्सिजन पार्क असे नाव देण्यात आले आहे. येथील सारडे विकास मंचाचे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आंबा, जांभूळ, काजू, पेरू, रांजण, शिवण, बांबू, भोकुरण, सिताफळ, निलगीरी, लिंबू, फणस, बोर, चिंच, तुळस, चाफा अशा विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे. त्यामुळे येथील कोमणादेवीच्या उजाड माळरानाचे नंदनवन बनले आहे.

या झाडांच्या लागवडीला आता १० वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे येथील बहुतांशी झाडे फळाफुलांनी बहरली असून, परिसरातील रानपाखरे येथील झाडांवर आलेल्या फळांचा मनसोक्त आस्वाद घेत असतानाचे चित्र येथे पहायला मिळत आहे. सकाळ-संध्याकाळ येथे होणारा या रानपाखरांचा किलबिलाट कानांना तर तृप्त करतोच, परंतु मनाला एक वेगळाच आनंद देतो.

या झाडांची देखभाल करण्याची जबाबदारी सारडे विकास मंचातर्फे घेण्यात आली आहे. दरम्यान, या झाडांना उन्हाळ्यात पाणी आणि पावसाळ्यात मातीची भरणी यासाठी येणारा जो खर्च आहे, त्या खर्चाची आर्थिक बाजू प्रसाद पाटील आणि स्वाती पाटील हे दांम्पत्य गेल्या सात वर्षांपासून सांभाळत आहेत आणि यापुढेही ते ही जबाबदारी सांभाळणार आहेत. सध्या उन्हाळा सुरू असून महिला मजुरांमार्फत या झाडांना पाणी देण्याचे काम सुरू आहे.

या निसर्गरम्य कोमणादेवी ऑक्सिजन पार्कला तालुक्यातील अनेक पर्यटक नागरिक भेटी देत असून, या अल्हाददायक निसर्गाच्या वातावरणात हे पर्यटक रममाण होत आहेत. या निसर्गरम्य नंदनवनात विविध प्रजातीचे पशुपक्षी पर्यटकांना येथे पहावयास मिळत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पर्यटक या कोमणादेवी ऑक्सिजन पार्कला नेहमीच भेट देत असल्याचे निदर्शनास येत आहे.



# भाजप सुपर वॉरियर्स, बूथ व शक्तिप्रमुखांची बैठक



**नवी मुंबई : बातमीदार**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कॉर्नर सभांच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला जावा याकरिता भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार नमो संवाद कॉर्नर सभा आयोजित करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्याच अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली नमो संवाद कॉर्नर सभांसंदर्भात रूपरेषा ठरविण्याकरिता भाजप सुपर वारीयर्स, बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुखांची बैठक झाली.

या वेळी रामचंद्र घरत, जयवंत सुतार, भाजप नवी मुंबई महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष माधुरी सुतार, राजश्री कातकरी, माजी नगरसेवक अशोक गुरखे, डॉ. जयाजी नाथ, गणेश म्हात्रे, सुनील पाटील, गिरीश म्हात्रे, प्रदीप गवस, दिपक पवार, दि. ना. पाटील, दत्ता घंगाळे, समाजसेवक राजू तिकोने, समाजसेवक पांडुरंग आमले, संजय ओबेरॉय, विकास सोरटे, जयश्री चित्रे, पुण्यनाथ तांडेल तसेच भाजपा सुपर वारीयर्स, बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजप सुपर वारीयर्स, बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुखांनी शक्तीकेंद्र स्तरावर बूथ निहाय नमो संवाद कॉर्नर सभा घेण्याच्या सूचना आमदार मंदा म्हात्रे यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिल्या.

## निवडक



### मुरूडमध्ये महात्मा फुले जयंती साजरी

**मुरूड** : येथील पंचायत समितीमध्ये थोर समाजसुधारक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास पंचायत समिती व आयसीडीएस विभागाचे कर्मचारी व समतादूत आदी उपस्थित होते. कक्षा अधिकारी संजय वानखेडे यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या तसबिरीला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या वेळी राजेंद्र दवटे, शुभांगी कोतवाल, अंकिता देडगे, सोनकुसरे, समतादुत वैशाली खरपडे (पेरवे) आदी उपस्थित होते. मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

### प्रिया कुलकर्णी यांना संगीत पुरस्कार

**मुरूड** : पै. खाँसाहेब आबीद हुसैन स्मृती संगीत मंडळ मुरूड-जंजिरा यांच्या वतीने पै. खाँसाहेब आबीद हुसैन



व कै. वामनराव भावे यांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल रोजी दुपारी ४ ते रात्री ८ या वेळेत वसंतराव नाईक महाविद्यालय येथे संगीत समारोहचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळी इंदौर निवासी यश फापुनकर व सार्थक संगमनेरकर यांचे गायन होणार असून संगीत विशारद प्रिया कुलकर्णी (नांदगाव) हिला गिरीजा कीर संगीतप्रेमी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रसिकांनी कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत भावे (माणगाव) व कार्यवाह डॉ. रवींद्र नामजोशी यांनी केले आहे.



**नागोठणे : भारतीय जनता पक्ष शिक्षण सेल रोहा तालुका अध्यक्ष अशोक अहिरे यांना ६५व्या वाढदिवसानिमित्त भाजप नेते किशोर म्हात्रे, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, अमृता अशोक अहिरे यांनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : शामकांत नेरपगार)

# आदिवासी भागात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील

## जिल्हाधिकारी किशन जावळे यांची माहिती ▌ वाड्या, वस्त्यांवर पथनाट्यातून मतदार जागृती

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आदिवासी गावामध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या बोली भाषेतील पथनाट्याद्वारे मतदार जनजागृती करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली. त्यांच्या हस्ते सिद्धेश्वर बु.येथे मतदार जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.



उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे आणि जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे यांच्या संकल्पनेतून तसेच एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प पेण, प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या सहकार्याने जिल्ह्यात हा पथदर्शी उपक्रम राबविला जात आहे. आदिवासी समाजाचे युवक आणि प्राथमिक शिक्षक हे पथनाट्य सादर करीत आहेत.

सिद्धेश्वर बु. येथे आयोजित या कार्यक्रमास निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, जिल्हा माहिती अधिकारी मनीषा पिंगळे, तहसीलदार उत्तम कुंभार आदी उपस्थित होते.

या वेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, आदिवासी वाड्या वस्त्या, गावे येथील मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. या प्रत्येक ठिकाणी एक स्वतंत्र मतदार दूत नेमण्यात येणार आहे. या दुतामार्फत गावातील प्रत्येक मतदाराला मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात येणार आहे. मतदानाच्या दिवशी सर्वांना भरपगारी सुट्टी देण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांनी कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भीडपणे मतदान करावे.

आदिवासीबहुल गावामधील मतदार काम व नोकरीसाठी कुठल्या आस्थापनांमध्ये जात असतील तरी तेथे सुट्टी देण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत. सर्व आदिवासी मतदारांना भर पगारी सुट्टी किंवा सवलत देण्याबाबत कळविण्यात येईल, असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.



या पथनाट्याचे लेखन-दिग्दर्शक राजू बांगारे यांनी केले आहे. गीतकार दामोदर शिद, वादक सतिश खाणेकर आहेत. पथनाट्यात राजू बांगारे, दामोदर शिद, ज्ञानेश्वर शिद, गणपत पारधी, साई बांगारे, श्रेयश वारगुडे, वेदांत शिंदे यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प संचालक श्रीमती अहिरराव यांनी केले. जिल्ह्यातील ११ तालुक्यातील आदिवासी वाड्या, वस्त्यांमध्ये पथनाट्य आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले. मतदानाच्या जनजागृतीसाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नाबद्दलही त्यांनी माहिती दिली.

## वनवासी कल्याण आश्रमातर्फे ३४ व्यावसायिकांना अर्थसहाय्य



**पेण : प्रतिनिधी**

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र आयोजित हुतात्मा नाग्या कातकरी स्वावलंबन योजनेच्या अंतर्गत रायगड जिल्ह्यातील १२ तालुक्यांतील ३४ नवीन उद्योजकांना घरघंटी, किराणा दुकान, गॅरेज, कटलरी व्यवसाय, भाजीपाला विक्री, सीएससी सेंटर, झेरॉक्स मशीन, कांडप यंत्र अशा व्यवसायांसाठी संस्थेच्या वतीने अर्थसहाय्य देण्यात आले.

जनजाती समाज उद्योग व्यवसाय या क्षेत्रात यावा व यशस्वी होण्याच्या दृष्टीने वनवासी कल्याण आश्रम संस्थेने नाविन्यपूर्ण कार्यक्रम शुक्रवारी (दि.१२) पेणमध्ये घेतला.

या कार्यक्रमास वनवासी कल्याण आश्रम संस्था प्रांत कार्यकर्ते सुनंदा वाघमारे, अमित साठे, प्रदीप पाटील तसेच जिल्हा कार्यकर्ते म्हणून विकास कोळी, उमेश जाधव, रोशनी ठाकूर, सखाराम पवार, रवींद्र पाटील, तालुका कार्यकर्ते प्रा. हेमलता सावंत, जयश्री घोडविंदे उपस्थित होते.

## नागोठणे भाजपतर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

### ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा

**नागोठणे : बातमीदार**

थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त नागोठणे येथील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात युवा नेते प्रसाद भोईर यांच्या उपस्थितीत महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर भोईर यांनी टिफिन बैठकनिमित्ताने कार्यकर्त्यांना नियोजनाची माहिती दिली.



या अभिवादन कार्यक्रमास भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, एकनाथ ठाकूर, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष अपर्णा सुटे, नागोठणे विभाग अध्यक्ष शेखर गोळे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष अंकुश सुटे, ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, नागोठणे शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, पवन जगताप, पप्पू सिंग, विलास खंडागळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, भाजप कार्यकर्त्यांनी रमजान ईदनिमित्त मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या.



## नवघर कासारवाडीत उद्या आरोग्य शिबिर

**पाली : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटी, डिस्ट्रीक्ट ३१४२ व सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागडात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन १४ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजता नवघर कासारवाडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये करण्यात आले आहे.

शल्य विशारद डा. श्रीपाद बोडस, त्यांच्या पत्नी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अंजली बोडस, आयुर्वेदाचार्य डॉ. मोनाली इंगळे, ऑर्थोपेडिक डॉ. जयंत गावंड तसेच डॉ. शर्मिला डाके, डॉ. ज्योती पारके, प्रिया शिंदे, बाबा कराळे, प्रिया तळगावकर आदींची टीम परिसरातील लहान मुले, तरुण-तरुणी, महिला व पुरुष यांची आरोग्य तपासणी करून विनामूल्य औषधोपचार करणार आहेत.

या शिबिराचा कासारवाडी, जाधववाडी, नवघर, आसरे, फळसुंडे, धोंडिवली, नवघर बौध्दवाडी, आसरे बौद्धवाडी, उंबरवाडी आदिवासी वाडी गावातील नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ ठाणे ग्रीन सिटीच्या माध्यमातून अध्यक्ष चंद्रशेखर लिमये, सेक्रेटरी अमित देशपांडे, युवा व्यवस्थापक मोहन तेलंग, माजी अध्यक्ष संग्राम जोशी, प्रकल्प समन्वयक सुधागड तालुका रहिवाशी सेवा संघ, ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे, समन्वयक बळीराम निंबाळकर, प्रचार व प्रसार कमिटी राजेश बामणे, प्रकाश शिलकर, अजय जाधव, विजय जाधव, राकेश थोरवे, प्रवीण बामणे, भगवान तेलंगे, दिनेश जाधव हे शिबिर यशस्वीतेसाठी कार्यरत आहेत.

## स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त नेरळमध्ये भाविकांची मांदियाळी



**कर्जत : प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थांचा प्रकट दिन सोहळा नेरळ शहरात मंगलमय आणि भक्तिमय वातावरणात झाला. अखिल भारतीय स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित सेवा केंद्र नेरळ यांच्या वतीनेदेखील नेरळ शहरात आयोजित करण्यात आलेल्या स्वामी समर्थ उत्सवामध्ये भाविकांची मांदियाळी पहायला मिळाली.

नेरळ पूर्व परिसरात मातोश्री नगर येथे श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाकडून आयोजित मंदिरात सकाळपासून दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. पालखी सोहळ्याचे आयोजन टाळ मृदुंगाच्या तालावर करण्यात आले होते. यामुळे शहरात चैतन्यमय आणि भक्तिमय वातावरण दिसून आले.

अखिल भारतीय स्वामी समर्थ दिंडोरी प्रणित सेवा केंद्र नेरळ यांच्या वतीने श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कमिटीचे यंदाचे तिसरे वर्ष होते. नेरळ पायरमाळ रजिस्टर कार्यलयाच्या मागे असणाऱ्या श्री स्वामी समर्थ केंद्र कमिटीकडून स्वामींच्या प्रकट दिनानिमित्त सकाळपासूनच भूपाळी, आरती, नैवेद्य, आरती, स्वामी चरित्र पारायण, तर सायंकाळी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. नेरळ पूर्व परिसरात येत असलेल्या मातोश्री नगर स्वामी समर्थ सेवा मंडळाकडूनदेखील विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथे दर्शनासाठी येणाऱ्या भविकांना महाप्रसादाचा लाभ देण्यात आला.

पायरमळ येथे स्वरांजली भजनी मंडळ नेरळ यांचे सुश्राव्य भजनआयोजित केले गेले होते. सकाळपासूनच मंदिरात दर्शनासाठी भाविकांच्या रांगा शहरात लागल्या गेल्या होत्या. दुपारच्या प्रखर उन्हातही दर्शनाची ओढ कायम होती.

## मुरूडमध्ये कलिंगडाची आवक

**मुरूड : प्रतिनिधी**

मागील वर्षापेक्षा यंदा कलिंगडाचे जास्त पीक आल्याने आवक वाढली. बाजारात कलिंगडची विक्री अल्प प्रमाणात होत असल्याने तसेच बाजारभाव मिळत नसल्याने माणगाव तालुक्यातील बोरघर गावातील शेतकरी आपल्या मळ्यातील गावठी कलिंगड टेम्पोमधून विक्री करण्यासाठी मुरूड बाजारपेठेत आणत आहेत.



उन्हाळा सुरू झाला की बाजारात कलिंगडला मागणी वाढते.हे कलिंगड शुगर किंग नावाने ओळखले जाते. नावाप्रमाणेच त्यांची चव साखरेसारखी गोड असते. फिक्कट हिरवा कलर असणारी गोल आकाराची छोटी-मोठी कलिंगड फ्रुड सलाट व ज्युस बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरली जातात सध्या आवक वाढल्याने कलिंगडचे भाव स्वस्त झाले आहेत. मोठ्यात मोठे कलिंगड किमान ६० ते ५० रुपयास मिळत असल्याने लोकांकडून समाधान व्यक्त होत आहे.

कलिंगड आता स्वस्त झाल्याने माध्यम व गरीबवर्गाला परवडणारे झाले आहे. त्यामुळे कलिंगड घेण्यासाठी गर्दी पहावयास मिळत आहे.

## पळसदरी येथील स्वामी समर्थ मठात संगीत मैफल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पळसदरी येथील समर्थ मठात श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित्त गुरू परमात्मा परेशू या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. या मैफलीत गायकांनी सादर केलेल्या मराठी भक्तीगीते व नाट्यगीतांनी उपस्थित भाविकांची मने जिंकली.



श्री स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित्त पळसदरी येथील समर्थ मठामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात गुरू परमात्मा परेशू या संगीत मैफलीचेही आयोजन करण्यात आले होते. मैफलीत एकापेक्षा एक सरस भक्तीगीते व नाट्यगीते गायक विजय बेडेकर आणि अचला मेधी यांनी सादर केली. त्यांना तबल्यावर कौशिक वांजळे, पखवाजवर यश हजारे, हार्मोनियमवर सुयोग ओक, तर ताल वाद्यावर शरद हजारे यांनी साथ संगत दिली. निवेदन वृषाली वैद्य यांनी केले.

या वेळी राजेंद्र निगुडकर, राजू पोतदार, विक्रांत दरेकर, डॉ. नितीन आरेकर, दिनेश अडावदकर, अभिजित दरेकर, अविनाश निगुडकर, अशोक शितोळे, रंजन दातार, सुधीर पोतदार, प्रभाकर करंजकर, नितीन दगडे, वत्सला वांजळे, समिधा विचारे, सृष्टी नीगुडकर, रघुनाथ निगुडकर, प्रदीप सुर्वे, अंकुश दरेकर, दत्तात्रेय दरेकर, विठ्ठल सुर्वे, मंगेश शिंदे, निलेश सुर्वे, कृष्णकांत दरेकर, महेंद्र शिंदे, रोनित दरेकर, कौस्तुभ पवार, त्रिजित शिंदे, विशाल निगुडकर, सचिन दरेकर, अमित घाडगे, नरेंद्र दरेकर आदी ग्रामस्थ तसेच स्वामीभक्त आवर्जून उपस्थित होते.

कर्जत हा संगीतप्रेमी तालुका म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथे सातत्याने सांगीतिक कार्यक्रम होत असतात. या संगीत मैफलीलाही श्रोत्यांचा प्रतिसाद लाभला.

# मुंबईचा बंगळुरूवर दमदार विजय

## बुमराहच्या भेदक गोलंदाजीनंतर ईशान-सूर्याची फटकेबाजी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुरुवारी झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू संघावर सात विकेट्सने मोठा विजय नोंदवला. आरसीबीने दिलेल्या १९७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इशान किशन, रोहित शर्मा आणि विस्फोटक फलंदाज सूर्यकुमार यादवच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर मुंबईने अवघ्या १५.३ षटकांतच हा शानदार विजय मिळवला आहे.



मुंबईच्या फलंदाजीची सुरुवात खूपच चांगली झाली. इशान किशनने सलामीला येत दुसऱ्याच षटकात षटकार लगावत फटकेबाजीला सुरुवात केली आणि नंतर वादळी खेळी केली. इशानने ३४ चेंडूंत पाच षटकार आणि सात चौकारांसह ६९ धावा केल्या आहेत, तर रोहितने संधी मिळताच फटके लगावत २४ चेंडूंत तीन षटकार आणि तीन चौकारांच्या जोरावर ३८ धावा केल्या. इशान बाद झाल्यानंतर आलेल्या सूर्याने वानखेडेवरील प्रेक्षकांसाठी चौकार-षटकारांसाठी खास आतिषबाजी केली. तीन महिन्यांनंतर सूर्याने आपला फॉर्म दाखवून देत अवघ्या १९ चेंडूंत चार षटकार आणि पाच चौकारांसह ५२ धावा केल्या. यानंतर हार्दिकनेही शानदार खेळी करीत सहा चेंडूंत तीन षटकारांसह २१ धावा केल्या आणि षटकारानेच संघाला विजय मिळवून दिला.

नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने चांगली सुरुवात केली. मुंबईचा दमदार गोलंदाज बुमराहने तिसऱ्या षटकात विराट कोहलीला इशान किशनकरवी विकेटच्या मागे झेलबाद केले. विराट अवघ्या तीन धावांवर बाद झाला. यानंतर विल जॅकने आठ धावांवर विकेट गमावली. मग आलेल्या रजत पाटीदारने शानदार खेळी करत संघाचा डाव सावरला. त्याने २६ चेंडूंत ५० धावा केल्या.

दुसऱ्या टोकाला असलेल्या कर्णधार फाफ डू प्लेसिसने ४१ चेंडूंत ६१ धावा करीत संयमी फलंदाजी केली, मात्र ग्लेन ग्लेन मॅक्सवेलने पुन्हा एकदा निराश केले आणि तो खाते न उघडताच बाद झाला. यानंतर आलेल्या फलंदाजांना बुमराहने माघारी धाडले, पण २३ चेंडूंत ५३ धावांची नाबाद खेळी करीत दिनेश कार्तिकने संघाची धावसंख्या १९६ धावांवर नेली. कार्तिकने आपल्या खेळीत पाच चौकार आणि चार शानदार षटकार मारले. मुंबईकडून बुमराहने पाच, तर कोएत्झी, आकाश मधवाल आणि श्रेयस गोपाल यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# रोहित शर्मा म्हणतो, मला वर्ल्डकप जिंकायचाय!

## सध्या निवृत्तीबद्दल विचार करीत नसल्याचीही स्पष्टोक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार रोहित शर्मा सध्या आयपीएलमध्ये व्यग्र आहे. आयपीएलच्या १७व्या हंगामानंतर लगेचच ट्वेंटी-२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे. ३७ वर्षीय रोहित शर्माने त्याच्या भविष्यातील योजनांबद्दल भाष्य केले असून भारतासाठी विश्वचषक जिंकण्याची इच्छा 'हिटमॅन'ने व्यक्त केली आहे.

रोहितच्या नेतृत्वात भारतीय संघाने गेल्या वर्षी वनडे विश्वचषक खेळला होता. सलग दहा सामने जिंकल्यानंतर यजमानांना अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. एका कार्यक्रमात बोलताना रोहितने विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला. तो म्हणाला की, मला आणखी काही वर्षे क्रिकेट खेळायचे आहे. मी आताच्या घडीला निवृत्तीबद्दल विचार करीत नाही, पण मला देशासाठी विश्वचषक जिंकायचा आहे. आगामी काळात होणारी २०२५ची जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धा आम्ही जिंकू अशी आशा आहे. मला आशा आहे की, हे सर्व करण्यात भारतीय



संघाला यश मिळेल.

मागील वर्षी भारतात झालेल्या विश्वचषकातील पराभवावर रोहितने उघडपणे भाष्य केले. त्याने सांगितले की, आम्ही ज्या लयीनुसार खेळत होतो ते पाहता आमचा पराभव होईल असे वाटत नव्हते. उपांत्य फेरीत विजय मिळाला तेव्हा मला वाटले की आता केवळ एक पाऊल दूर आहे, पण अंतिम सामन्यात आमचा दिवसच खराब होता असे म्हणावे लागेल तसेच ऑस्ट्रेलियाने आमच्यापेक्षा चांगले क्रिकेट खेळले.











पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ महायुती पदाधिकारी मेळावा आकुर्ली येथील काकाजीनी वाडी या ठिकाणी झाला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, अमोल इंगोले, पीआरपीचे सीताराम कांबळे आदी उपस्थित होते.


















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com